विद्या प्रसारक मंडळ, ठाणे


| | | |
|---|---|---|
| मासिकाचे नाव | : | दिशा |
| संपादक | : | डॉ. विजय वा. बेडेकर |
| प्रकाशक | : | विद्या प्रसारक मंडळ |
| प्रकाशन वर्ष | : | २००४ |
| वर्ष | : | पाचवे |
| अंक | : | ९ |
| पृष्ठे | : | ४० पृष्ठे |

**गणपत्रिका विद्या प्रसारक मंडळाच्या "ग्रंथालय" प्रकल्पांतर्गत निर्मिती**

**गणपत्रिका निर्मिती वर्ष : २०१०**

**गणपत्रिका क्रमांक : ८४**

MAHMAR 19358/13/1/2000 - TC



विद्या प्रसारक मंडळ

व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष पाचवे / अंक ९ / ऑगस्ट २००४

## संपादकीय

### सत्तराव्या वर्षात पदार्पण करताना

संस्था मोठ्या होण्याकरीता स्वप्न पहाणारे कार्यकर्ते लागतात. तनमनधन याबरोबरच आपल्या आयुष्यातला वेळ देणारी, झोकून देणारी माणसे लागतात तेव्हाच संस्था वाढतात. आपल्या सामाजिक बांधिलकीला स्मरून कार्यरत राहतात.


एक ऑगस्ट हा आमच्या मंडळाचा स्थापनादिन, वर्धापनदिन. ६९ वर्षांचा टप्पा पार करून आम्ही ७०व्या वर्षात पदार्पण करणार आहोत. या वेळी स्वाभाविकच प्रकर्षाने आठवण येत आहे ती आमच्या दूरदृष्टी असणाऱ्या डॉ. वा. ना. बेडेकरांची. डॉक्टरांच्या एका मुलाखतीत ते म्हणाले होते, ''या अध्यक्षपदाच्या कारकीर्दीचे वैशिष्ट्य म्हणजे मला सर्व चांगली माणसे भेटली. सर्वांचे उत्तम सहकार्य मिळालं म्हणून आज हा वटवृक्ष वाढला.'' डॉक्टरसाहेब नेहमी कृतज्ञ असत. महाविद्यालयांच्या इमारतींचे स्वप्न पाहून ते थांबले नाहीत तर त्यांनी दूरदृष्टी असणारे वास्तुशास्त्रज्ञ श्री. वसंतराव पानसरे यांच्या हाती विकासाची सूत्रे दिली. पानसरेंबद्दलही त्यांच्या मनात कृतज्ञता होती. झाडांमध्ये राहणारे, शिक्षणावर अतोनात प्रेम असणारे आमचे डॉक्टर आज प्रथमच वर्धापन दिनाला असणार नाहीत.

पण संस्था माणसांपेक्षा मोठ्या असतात. त्या उभ्या करणाऱ्यांच्या नंतर येणाऱ्या कार्यकर्त्यांनी, पिढ्यांनी त्यांचा विकास चालू ठेवायचा असतो. आज महाविद्यालयातील ज्ञानपथ पाहाणारे चकित होतात. यामागे एक ऑगस्टचे वृक्षारोपण कारणीभूत आहे. यंदाही एक ऑगस्टला झाडे लागतील. डॉक्टरांच्या स्वप्नांनी बहरतील पण त्याचबरोबर श्री. पानसरेंचा होणारा गौरव हा या दिवशी व्यक्त होणाऱ्या कृतज्ञतेचे प्रतीक असेल. संस्था मोठी होताना ज्या अनेकांनी आपले योगदान दिले त्यांच्या प्रतीही या वेळी मनात कृतज्ञता असणार आहे. या कार्यकर्त्यांत वाटचालीत सिंहाचा वाटा असणारे कै. गुणाकर जोशी,जनकवी कै. पी. सावळराम, कै. धों. वा. टिळू, तंत्रनिकेतनाची मुळे रुजविलेले कै. रा. कृ. गोखले, कै. छबुनाना जोशी, कै. चिं. शं. जोशी .... अशी खूप नावे आहेत. विद्या प्रसारक मंडळाच्या वर्धापन दिनी या सर्वांची आठवण, या सर्वांच्या सहवासातील जडण घडण करणारे समृद्ध क्षण मनात दाटून येत आहेत.


सत्तराव्या वर्षांपैकी ४७ वर्षे अध्यक्षपद सांभाळून संस्थेला आज रूप देण्यात सिंहाचा वाटा असणारे कै. डॉ. वा.ना. बेडेकर आज नाहीत याची खंत मात्र मनात आहे. तरीही पुढे जायचे आहे. या सर्वांच्या स्मृतींनी जे बळ दिले त्या बळावर

'अनंत आमुचि ध्येयासक्ती, अनंत अन आशा' हे विसरायचं नाही.

विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर ही माझी प्रार्थना नाही.
विपत्तीमध्ये मी भयभीत होऊ नये एवढीच माझी इच्छा.
दु:खतापानं व्यथित झालेल्या माझ्या मनाचे
तू सांत्वन करावंस अशी माझी अपेक्षा नाही,
दु:खावर जय मिळवता यावा एवढीच माझी इच्छा.
माझ्या मदतीला कोणी आलं नाही
तर माझं बळ मोडून पडू नये एवढीच माझी इच्छा.
जगात माझं नुकसान झालं,
केवळ फसवणूकच वाट्याला आली,
तर माझं मन खंबीर राहावं एवढीच माझी इच्छा.
माझं तारण तू करावंसं, मला तारावसं ही माझी प्रार्थना नाही.
तरून जाण्याचं सामर्थ्य माझ्यात असावं एवढीच माझी इच्छा.
माझं ओझं हलकं करून
तू माझं सात्वन केलं नाहीस तरी माझी तक्रार नाही
ते ओझं वाहायची शक्ती मात्र माझ्यात असावी एवढीच माझी इच्छा.
सुखाच्या दिवसात नतमस्तक होऊन
मी तुझा चेहरा ओळखावा दु:खाच्या रात्री
सारं जग जेव्हा माझी फसवणूक करील
तेव्हा तुझ्याविषयी माझ्या मनात
शंका निर्माण होऊ नये
एवढीच माझी इच्छा



**- गुरुदेव रवींद्रनाथ टागोर**




**वर्ष पाचवे / अंक ९ / ऑगस्ट २००४**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
प्रा. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष ९ वे / अंक २ रा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्यामंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिंटस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
दूरध्वनी : २५३४ १२९१
२५४१ ३५४६

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | ठाण्याला वास्तूरुप देणारे शिल्पकार | नरेंद्र बेडेकर | ३ |
| २) | धर्मराज्यस्थापक श्रीकृष्ण | शं.बा. मठ | ६ |
| ३) | डॉ. मो.दि. पराडकर यांचे आत्मकथन | डॉ. मो.दि. पराडकर | ११ |
| ४) | महाभारतातील समस्या | माधुरी पाटील, कीर्ती शिंगोटे<br>सुचेता जोशी, प्राची प्रधान<br>स्वाती वैशंपायन, पल्लवी जाधव | १६ |
| ५) | घारापुरी | सौ. मंजिरी दांडेकर | १९ |
| ६) | 'लगोरी' - एक वाचनीय काव्यसंग्रह | गीतेश शिंदे | २२ |
| ७) | अविचल | प्रसन्न गो. कुलकर्णी | २५ |
| ८) | साहित्यजगत | शरद जोशी | २६ |
| ९) | पुस्तक परिचय | सौ. मंजिरी कुलकर्णी | २८ |
| १०) | स्वातंत्र्यवीर सावरकरांना अभिप्रेत | सौ. मालती देवधर | ३१ |
| ११) | परिसर वार्ता | संकलित | ३४ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# आवाहन

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ही संस्था ठाण्यात गेली ६० वर्षांहून अधिक काळ शिक्षणक्षेत्रात कार्य करीत आहे. मराठी व इंग्रजी शाळांबरोबरच कला, वाणिज्य, विज्ञान व विधी शाखांची महाविद्यालये, तंत्रनिकेतन व संगणक अभ्यास केंद्र अशी सर्वांगीण शिक्षणाची व्यवस्था संस्थेने केली आहे. पाठ्यपुस्तकीय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगचे कला, क्रीडा इ. क्षेत्रातील गुण विकसित व्हावेत म्हणून संस्था विविध उपक्रम राबवीत आली आहे. या सर्वांच्या परिणामस्वरूप संस्थेचे विद्यार्थी अभ्यास व अभ्यासेतर परीक्षा व स्पर्धात उत्तम यश मिळवीत असून संस्थेचे माजी विद्यार्थी समाजात विविध क्षेत्रात कार्यप्रवण आहेत.

आज टी.व्ही., व्हिडिओ, सिनेमा व तत्सम नियतकालिके भोगवादी, नीतीहीन संस्कृतीचा प्रसार करण्यात अग्रेसर आहेत. याउलट विधायक, संस्कृतिरक्षक विचार पोचवतील अशी माध्यमे अल्पसंख्य आहेत. उद्याचे नागरिक बनणाऱ्या संस्कारक्षम विद्यार्थ्यांना वैचारिक खाद्य पुरवावे, त्यांच्यात ईर्षा निर्माण व्हावी व त्यांनी अर्थार्जन व व्यावसायिक यशाबरोबरच सामाजिक कार्य साधावे, या उद्देशाने मंडळाने 'दिशा' हे नियतकालिक जुलै १९९६ पासून सुरू केले आहे.

आपण या मासिकाचे वर्गणीदार होऊन किंवा या मासिकात जाहिरात देऊन आमच्या कार्याला हातभार लावावा ही विनंती ! तसेच आपल्या अमूल्य देणग्या देऊनही आपण दिशासाठी हातभार लावू शकता.

संपादक, दिशा

**विद्या प्रसारक मंडळ, नौपाडा, ठाणे.**

दूरध्वनी : २५४२ ६२७०

टीप : वर्गणी/जाहिरात वा देणगीची रक्कम चेकने पाठवावी.

चेक ''**विद्या प्रसारक मंडळ A/c दिशा**'' या नावाने पाठवावा.

**वार्षिक वर्गणी रु. २५०/-**

सदर अंकाची किरकोळ विक्रीची किंमत रु. २५/- फक्त.

वर्गणी पाठविताना आपला पूर्ण पत्ता, पिन कोड व दूरध्वनी सह कळवावा.

# ठाण्याला वास्तुरूप देणारे शिल्पकार

*विद्या प्रसारक मंडळाच्या महाविद्यालयाच्या इमारतीचे शिल्पकार श्री. पानसरे यांच्या भरीव सहकार्यपूर्ण कारकीर्दीबद्दल कृतज्ञता म्हणून विद्या प्रसारक मंडळाने १ ऑगस्ट रोजी त्यांचा गौरव करण्याचे ठरविले आहे. त्यानिमित्ताने*

*- संपादक*

व्यक्तिप्रमाणेच प्रत्येक शहराला स्वत:चा असा वेगळा चेहरा असतो, वेगळी ओळख असते. ही वेगळी ओळख कधी त्या शहराला पूर्वसंस्कृतीतून प्राप्त होते, कधी त्या शहराच्या विकासाप्रती ध्येयनिष्ठेने समर्पित होणाऱ्या संस्थांमुळे ती मिळते, तर कधी शहराच्या छायेत वाढलेल्या आणि संपन्न झालेल्या गुणीजनांमुळेही त्या शहराला ओळखले जाते. सुदैवाने, ठाणे शहराला स्वत:चं वेगळेपण प्राप्त होण्यात या तीनही घटकांचा समुच्चय कारणीभूत आहे. म्हणूनच की काय शहरीकरणाच्या आणि आधुनिकीकरणाच्या रेट्यात गावं आणि शहरं स्वत:चा चेहरा हरवून, मुखवटे धारण करीत असताना ठाण्याचा चेहरा अद्याप बऱ्याच अंशी टिकून आहे.



संस्कृतीच्या दृष्टिकोनातून ठाण्याची ओळख दाखविणाऱ्या प्राचीन शिलाहार संस्कृतीच्या खुणा आता काळाच्या उदरात गडप झाल्यात. आधुनिक शिक्षण क्षेत्रातली ठाण्याची ओळख आज खाडीकिनारी विद्या प्रसारक मंडळाच्या भव्य महाविद्यालय संकुलामुळे ठसठशीतपणे उभी आहे तर कलाक्षेत्रातला ठाण्याचा मानदंड तलावाकाठी गडकरी रंगायतनच्या रूपात कलाकारांना प्रोत्साहित करतो आहे. एकविसाव्या शतकात प्रवेश करताना 'देशातलं सर्वात सुंदर शहर' असा लौकिक मिळाल्यामुळे ठाणे महानगरपालिकेची नवी वास्तू आज हा बहुमान अभिमानाने मिरवतेय.

शहराची ओळख असलेल्या या प्रत्येक वास्तूच्या निर्मितीचं प्रयोजन वेगळं. त्या मागच्या प्रेरणाही वेगवेगळ्या. मात्र या साऱ्या वास्तूंना मूर्त स्वरूप देण्यामागची कल्पक शक्ती मात्र एकच आहे. ती म्हणजे वास्तुरचनाकार वसंत पानसरे...

ठाण्याच्या संस्कृतीशी एकरूप झालेले पानसरे खरं तर महाराष्ट्राच्याही बाहेरचे सुमारे २०० वर्षांपूर्वी राजा भिमदेवाबरोबर अनेक जण मराठी मुलखात आले. राजाच्या पराभवानंतर काही त्याच्याबरोबर परत गेले तर काही कुटुंबियांनी याच भूमीला 'आपली' मानली आणि इथल्या जनसंस्कृतीशी ते एकरूप झाले. पानसरे कुटुंबीय हे त्यापैकीच एक असावेत. पण दोनशे वर्षे ठाण्याशी निगडीत असल्याने ते अस्सल ठाणेकरच झाले आहेत.

पानसरे यांचं वास्तव्य असलेल्या नौपाडा भागातल्या जागेतच ते १८९६ पासून रहातायत. साहजिकच ठाण्याचं मूळ रूप आणि त्यात बदल होत आजचं प्राप्त झालेले स्वरूप याचे पानसरे खानदान 'साक्षीदारच' आहेत. श्री. पानसरे यांच्याशी गप्पा मारताना जुन्या ठाण्याच्या आठवणी निघणं स्वाभाविकच होतं.

पूर्वी ठाणे हे तलावांचं शहर म्हणून ओळखलं जाई. ठाणे शहराचा पहिला आराखडा ज्या ब्रिटिश रचनाकारानं बनविला त्यानेच खऱ्या अर्थानं या शहराच्या विकासाबाबात योग्य दृष्टी दाखवली होती, असं पानसरे यांचं मत आहे. त्या आराखड्यानुसार मासुंदा तलाव

बाजूला करून स्टेशनवरून टेंभीनाक्याला जाणाऱ्या रस्त्याचं झालेलं नियोजनबद्ध काम त्यांना अजूनही आठवतं. नंतर नंतरच्या काळात 'मुंबईत नोकरी करणाऱ्यांची वसाहत' असच स्वरूप ठाण्याला आल्यामुळे इथल्या सांस्कृतिक उपक्रमांना खिळ बसत गेली. त्यानंतर ठाणे नुसतं भरत गेलं, पण शहर म्हणून त्याचा विकास झाला नाही अशी खंत पानसरे व्यक्त करतात. 'आता ठाण्यात नवनवीन संकुले उभी रहायतायत. नवी बांधकामे होतायत पण सध्या जुन्या ग्रीक किंवा रोमन शैलीच्या वास्तूरचनांची नकल करण्याकडे कल आहे. इमारती उभ्या होतायत पण वास्तुरचनेत 'थिम'चा अभाव आहे.' - वास्तूरचना क्षेत्रातल्या अर्धशतकाच्या दीर्घ अनुभवाचेच हे बोल होते.

वास्तुरचनाकार व्हावं हे पानसरे यांचं लहानपणापासूनचंच स्वप्न होतं. त्यांच्या घराण्यातही त्या दृष्टीनं अनुकूल अशी बीजं होती. त्यांचे एक चुलतकाका शिल्पकार म्हणून विख्यात होते. मुंबईच्या शिवाजी पार्क इथला छत्रपतींचा अश्वारूढ पुतळा त्यांनीच घडविलेला. एक मोठा चुलतभाऊही वास्तूविद्या विशारद पण पानसरे यांना मात्र आपले स्वप्न साकार करण्यासाठी अनेक वळणांना सामोरं जावं लागले.

ठाण्याच्या न्यू इंग्लीश स्कूलमधून ते १९४२ साली मॅट्रिक झाले. शिक्षणाचं माध्यम मराठी असलं तरी तेव्हाची शिकवण्याची पद्धत चांगली असल्यामुळे पुढे कधीही कुठलीही अडचण आली नाही असं ते आवर्जून सांगतात. मॅट्रिकला चांगले मार्कस् असल्यामुळे आणि वडिलांची इच्छा मुलाने डॉक्टर व्हावे ही असल्यामुळे पानसरे यांना विज्ञान शाखेकरता रुईया कॉलेजमध्ये दाखल व्हावं लागलं. पुढे वैद्यकीय शिक्षणाचा बेत साध्य झाला नाही. पण विज्ञानाची पदवी (B.Sc.) प्राप्त झाली. नंतर त्या वेळच्या प्रथेनुसार नोकरीची शोधाशोध सुरू झाली आणि मुंबई नगरपालिकेत लेखापरीक्षण विभागात नोकरीही मिळाली. पण या नोकरीत पानसऱ्याचं मन रमलं नाही. शिक्षण विज्ञानाचं, नोकरी वाणिज्य विषयासंबंधी आणि मनाचा ओढा कलाक्षेत्राकडे अशा त्रिखंडित अवस्थेत नोकरीचा



राजीनामा हाच कोंडी फोडण्याचा जवळता मार्ग होता. त्याचाच अवलंब केला गेला.

नोकरीत असताना स्वत:च्या कलात्मक सृजनतेला वाव मिळेल असा एक वेगळा व्यवसाय त्यांनी ठाण्यात सुरू केला होता. जुन्या पालिका इमारतीच्या समोर पानसरे कुटुंब रहात असलेल्या जागीच 'स्टायफोर्ट' (Styfort) हे ठाण्यातलं तेव्हाचं 'फॅशनेबल' कपडे शिवून मिळण्याचं दुकान त्यांनी सुरू केलं. नोकरी सोडल्यावर काही वर्ष दुकानात स्थिरावल्यावर पुन्हा एकदा वास्तूरचनाकार व्हायच्या स्वप्नानं उचल खाल्ली. एवढ्यातच जे.जे. स्कूलमध्ये त्या विषयाचा अर्धवेळ अभ्यासक्रमही सुरू झाला होता. जीवनात स्थैर्य आल्यानं घरूनही आडकाठी होण्याचं कारण नव्हतं. जे.जे. मधला जी.डी. (आर्क) अभ्यासक्रम इंटरमिजिएटपर्यंत होतो न होतो तोच एक नवीन वळण सामोरं आलं. पण आधीच्या वळणाप्रमाणे हे वळण स्वप्नापासून दूर नेणारं नव्हे तर स्वप्नपूर्तीला नवी दिशा देणारं होतं. त्यावेळी इंग्लंडमध्ये वास्तूविद्येचं शिक्षण मिळण्यासंबंधी संधी उपलब्ध होती. पण परदेशी जाण्यासंबंधी काही नियमांची पूर्तता करणे आवश्यक होते. पानसरे कुटुंबियांचे फॅमिली डॉक्टर असलेल्या डॉ.वा.ना.बेडेकरांनी त्या नियमांची पूर्तता होण्यासाठी मदत केली आणि पानसरे वास्तूविद्येच्या शिक्षणासाठी इंग्लंडला रवाना झाले.

इंग्लडहून परतल्यावर ठाण्यातलं पहिलं मोठं काम डॉ. वा.ना.बेडेकरांसाठीच त्यांनी करावं हा एक योगायोगच. तेव्हा डॉ. बेडेकर ठाण्यात महाविद्यालय उभारण्याच्या ध्येयानं झपाटून गेले होते. ठाणे महाविद्यालयाची 'साईट' पहाण्यासाठी डॉक्टरांबरोबर होडीतून खाडीत जाऊन कशी पहाणीकेली त्याचं वर्णन आजही पानसरे करतात. जवळजवळ खाडीतच बांधकाम करायचं, अॅप्रोच रोड ही नाही. बरं हे सारं 'असाध्य ते साध्य' करण्यासाठी पैशाचंही पाठबळ नाही. केवळ डॉक्टरांच्या दुर्दम्य इच्छाशक्तीमुळे आणि दूरदृष्टीमुळे हे महाविद्यालय संकुल उभं राहिलं असं पानसरे प्रांजळपणे सांगतात. या संकुलाचा आराखडा तयार करताना विकासाला वाव राहील आणि विकास होत असताना सौंदर्याला बाधा येणार नाही हा दृष्टिकोन ठेवला गेला. वास्तूची वाढण्याची क्षमता (Organic Quality), लवचिकता (flexibility) आणि सौंदर्यदृष्टी यांचा नेमका तोल या आराखड्यात साधला गेला. ठाणे महाविद्यालयाचे हे संकुल आता सर्वांगांनी विकसित झालं असलं तरी मूळ आराखड्यावर हुकूमच हा विकास झालाय हे श्रेय जसं वास्तुरचनाकाराचं तसंच विद्या प्रसारक मंडळाचंही.

गडकरी रंगायतनच्या बाबत ते केवळ नाट्यगृह होऊ नये, सर्व कलाशाखांचा विकास आणि संवर्धन त्या वास्तूत व्हावं अशी दृष्टी ठेवून पंडित पानसरे यांच्या आर्किटेक्चर असोसिएशनने आराखडा तयार केला. नाट्यगृह, तालीम हॉल, कलादालन अशा सुविधा उपलब्ध करून दिल्या. ध्वनी विज्ञानाच्या (Acoustic) दृष्टिकोनातून देशातल्या उत्कृष्ट नाट्यगृहात रंगायतननं स्थान मिळवलं आहे.

ठाणे महानगरपालिकेच्या नव्या वास्तूसाठी अनेकांनी आराखडे दिले होते. वास्तूमधल्या आवश्यक बाबींबरोबरच वास्तूत शिवाजी महाराजांचा पुतळा असावा अशी संबंधितांची इच्छा होती. वास्तूत कुठेतरी पुतळ्यासाठी चौथरा ठेवण्याऐवजी त्या वास्तूतून महानगराचं प्रशासन कार्य करणार आहे. त्या वास्तूवरचं उत्कृष्ट प्रशासनासाठी शिवाजी महाराजांनी निर्माण केलेल्या अष्टप्रधानांची मुद्रा असावी अशी संकल्पना पानसरे यांच्या आराखड्यात मांडली होती. अष्टकोनी मुख्य प्रशासकीय इमारत, त्याला जोडून एका बाजूच्या इमारतीत लोकप्रतिनिधींसाठी विविध कक्ष आणि पलीकडे पालिका कर्मचारी आणि अधिकारी यांच्यासाठी वेल्फेअर सेंटर असा सध्याच्या इमारतीचा आराखडा निश्चित झाला.

वास्तूचा आराखडा करताना त्या वास्तूच्या निर्मितीचा उद्देश प्रथम ध्यानात घ्यायला हवा. त्या दृष्टीनं वास्तू अधिकाधिक उपयुक्त व्हायला हवी. या उपयुक्ततेच्या दृष्टीनंच वास्तूला तिचा वैशिष्ट्यपूर्ण आकार प्राप्त होतो. उपयुक्तता आणि सौंदर्यपूर्ण आकार या पूरक गोष्टी आहेत, असं पानसरे यांचं मत आहे.

आज वयाच्या ७८ व्या वर्षी पानसरे आपल्या कारकीर्दीबद्दल पूर्ण समाधानी आहेत. ठाण्यातल्या अनेक वास्तूंबरोबरच मुंबईतल्या मरीन ड्राईव्हवरचं जवाहर बाल भवन, भायखळा पुलाजवळ टॉल ब्लाक्स्च्या स्वरूपात उभी असलेली ख्राईस्ट चर्च हायस्कूलची इमारत आणि अनेक छोट्या मोठ्या निवासी, औद्योगिक वास्तू त्यांच्या यशाची कहाणी सांगायला समर्थ आहेत. अनेक सरकारी समित्या, आय.आय.टी.सारख्या शिक्षण संस्थांच्या समित्यावर त्यांची नियुक्ती करून त्यांच्या या क्षेत्रातल्या अनुभवाचा गौरवही झालाय.

आपल्या आजवरच्या वाटचालीत वास्तूविद्येचे धडे देणारे आणि पुढे व्यवसायात भागीदारी देऊ करणारे गुरू श्री. गॉफ यांचं खूप योगदान आहे असं पानसरे सांगतात. आर्किटेक्चर असोसिएशनचे सर्व सहकारी आणि डॉ. वा.ना.बेडेकर यांचंही आपल्या वाटचालीत महत्त्वपूर्ण योगदान आहे असं ते मानतात.

वयानुसार पानसरे आज निवृत्त असले तरी आपल्या आवडीच्या क्षेत्रात पूर्णपणे कार्यरत आहेत. आपल्या व्यवसायात प्रामाणिकपणे झोकून देण्याच्या वृत्तीमुळे स्वत:च्या कौटुंबिक जबाबदाऱ्या त्यांनी निर्माणच केल्या नाहीत पण आज पानसऱ्यांच्या एकत्र कुटुंबात ते बिलकुल

(पान क्र. १८ वर)

# धर्मराज्यस्थापक श्रीकृष्ण

*भगवान श्रीकृष्णाचे वास्तव चरित्र काय होते, याचा अभ्यासपूर्ण विचार मांडणाऱ्या लेखमालेतील हा सहावा लेख*
*- संपादक*

**(लेखांक सहावा)**

**श्रीकृष्णाची भेदनीती**

कर्णाचे दुर्योधनाकडे असलेले महत्त्व श्रीकृष्णाला माहीत होते. जिच्यामुळे दुर्योधन उड्या मारतो अशी व्यक्ती म्हणजे कर्ण. कर्णाला दुर्योधनापासून फोडण्याचा श्रीकृष्णाने प्रयत्न केला. पांडवाशी त्याचे नाते उघड करून त्याचे मन विचलित करणे हे त्याने केले. त्याला आपल्या रथात घेतले व खरी गोष्ट सांगितली. हे कळताच कर्णावर विलक्षण परिणाम झाला. आपण केलेल्या अन्यायाची त्याला लाज वाटू लागली. पांडव तुझे भाऊ आहेत, या वाक्याने पांडवाच्या विद्वेषाची कर्णाच्या अंत:करणातील धार बोथट करणे, द्रौपदीवर केलेल्या अन्यायाची टोचणी लागणे, अन्याय परिमार्जनासाठी पराभव पत्करण्याची मनाची तयारी होणे, हा उद्देश श्रीकृष्णाने साध्य केला.

ज्याचा नेता हृषिकेश योद्धा धनंजय आहे तो धर्मात्मा युधिष्ठिर पृथ्वीचा चिरकाळ राजा असावा, असे कर्ण म्हणू लागला. अजाणता पांडवाना दु:ख दिल्याबद्दल मला वाईट वाटत आहे. अर्जुनाने मला युद्धात ठार मारावे हे एकमेव त्या पापाचे प्रायश्चित ठरेल. मी तुला भविष्य सांगतो की, मी, भीष्म, द्रोण व दुर्योधन यांच्या मरणानेच हा यज्ञ समाप्त होईल.

**संधि प्रकरणाचे फलित**

१) लोकापवाद टळला. २) युद्धाला युधिष्ठिराची अनुमती मिळाली. ३) कौरवांच्या पक्षात भीष्मादी योध्यात न्यूनगंड निर्माण झाला. ४) कर्णाचा उत्साह संपला. ५) कौरव योध्यांची विसंवादिता प्रगट झाली. ६) आपले शत्रू जगताच्या दृष्टीनेही वध्य ठरविले गेले.

यातच पांडवांच्या युद्ध विजयाचे खरे रहस्य साठविलेले आहे.

**मंत्रयुद्धाचा परिणाम**

कौरव पक्षातील सेनापती पांडवांच्या जयाची इच्छा करू लागले. आपला पक्ष अन्याय्य आहे. पांडवांचा पक्ष न्याय्य आहे. आपला पराभव होऊन आपल्याला मृत्यू आला तरी चालेल, विजय पांडवांचा व्हावा, असे त्यांना मनोमन वाटत होते.

धृष्टद्युम्नाला सेनापती म्हणून नियुक्त केले. त्यात श्रीकृष्णाचे बुद्धिचातुर्य दिसते. हा द्रौपदीचा भाऊ. हे युद्ध द्रौपदीच्या सूडासाठीच होते. कौरवांचा अत्यंत द्वेषभाव असणे आवश्यक. इथे विजयच अपेक्षित नसून शत्रूपक्षाचा समूळ नाश अभिप्रेत होता.

पांडवांचा एकतंत्री संघटित पक्ष आहे. सर्वांच्या अंत:करणात केवळ प्रेमभक्ती व आत्यंतिक विश्वास आहे. उद्दिष्ट न्याय्य असल्याबद्दल विश्वास न्याय प्रतिष्ठापनासाठी आपला झगडा ही श्रद्धा. शत्रूविषयी अंत:करणात पूर्ण तिरस्कार व त्याच्या विनाशासाठी अत्यंत उत्सुक असलेला पक्ष

बहवो यत्र नेतार: सर्वे पंडित वादिन: । सर्वे महत्वमिच्छन्ति तत् राष्ट्रं अवसीदति ।

ज्या राष्ट्रात नेतेच पुष्कळ आणि ते स्वत:स शहाणे समजणारे असतात त्यापैकी प्रत्येकजण महत्पदाची अभिलाषा धरणारा असतो ते राष्ट्र लौकरच विनाश पावते.

एकंदर विघटना व परस्पर मत्सराने प्रेरित झालेल्या लोकांची कशीबशी एकत्र उभारलेली फळी हे दुर्योधनाच्या बहुसंख्य सैन्याचे वस्तुत: स्वरूप होते.

नीतिमूल्यांचे संरक्षण व विश्वकल्याण या दोन उद्दिष्टासाठी तो भीषण नरमेध - श्रीकृष्णाला आवश्यक वाटला. जिचे शुद्धीकरण अशक्य ती राज्यसंस्था नष्ट करून टाकणे हेच आवश्यक ठरते. भारतीय युद्धाचा संपूर्णपणे विचार केला तर त्या युद्धातील विजयश्रीचे सर्व श्रेय एकट्या श्रीकृष्णाचे आहे ही गोष्ट मान्य करावीच लागेल.

युद्धाच्या आरंभीच मोहवश झालेल्या अर्जुनाला भगवान् श्रीकृष्ण होते म्हणून गीतोपदेश झाला व तो युद्धासाठी उभा राहिला. श्रीकृष्ण नसता तर महारथी पार्थ कौरवांच्या हातून नाहक मरता, युद्धाचा संभवही राहिला नसता.

कौरव वृद्धांना श्रीकृष्णाच्या कौशल्याने व मुत्सद्देगिरीनेच ठार मारण्यात आले. भीष्म, द्रोण, कर्ण इत्यादींना नष्ट करण्यात आले. दुर्योधनाची पण तीच गती झाली.

**श्रीकृष्णाची अपूर्व बुद्धिमत्ता**

श्रीकृष्णाने सोडवलेला नाही असा एकही बौद्धिक पेचप्रसंग नाही. प्रत्येक धर्मसंकटावर मात करणारी, त्या संकटातून मार्गदर्शन करणारी व ते संकट आणणाऱ्यांच्यावरच उलटवून आपल्या पक्षाची सुटका करून घेणारी अशी त्या बुद्धिमत्तेची वैशिष्ट्ये आहेत.

पांडवांना श्रीकृष्णाने सांगितले वाटाघाटीचा घोळ हवा तितका चालू द्या, पण पहिल्या प्रथम सर्व राजे लोकांना बोलावून घ्या. नाहीतर दुर्योधन त्यांना आपल्या पक्षाला साहाय्य करण्यास्तव बोलावील व तुम्हाला पंचाईत पडेल.

राजकीय युद्धे नेहमीच दोन प्रकारची असतात. एक सर्व लोकांना स्पष्टपणे प्रत्ययास येणारे असे उघड युद्ध असते. दुसरे डोळ्यांना न दिसणारे असे मंत्रयुद्ध असते. युद्धात जय मंत्र युद्धामुळेच मिळत असतो. शत्रूच्या मनोवृत्तीचा पूर्णपणे लाभ घेऊन त्यावर आपले सर्व डावपेच उभारावयाचे व त्यांनी शत्रूच्या अंत:करणावर हवा तो परिणाम घडवून आणावयाचा हाही मंत्र युद्धाचाच एक भाग आहे.

भगवान श्रीकृष्णाच्या अपूर्व बुद्धिकौशल्याने पांडवांच्याभोवती संरक्षण कवच उभारले नसते तर स्वत: पांडव सुद्धा वाचले नसते. स्वत:च स्वत:च्या खोड्याभोवती उत्पन्न केलेल्या जाळ्यातून सुटका न होता ते विनाश पावले असते.

साऱ्या महाभारताच्या इतिहासात एकही प्रसंगांची अशी तटबंदी नाही जेथे श्रीकृष्णाची तीक्ष्ण व मार्गदर्शक बुद्धी अणुमात्र तरी अडखळलेली आहे. शिशुपालाला ठार मारण्यात श्रीकृष्णानी पुढील गोष्टी साधल्या -

१) खऱ्या क्षत्रियाप्रमाणे आव्हान स्वीकारून शत्रूला ठार मारण्यात धर्माचे पालन केले.

२) द्वारकेवर हवे तसे अत्याचार करणाऱ्या समाजकंटकाला ठार करून सदाचा एक उपद्रव नाहीसा केला.

३) युधिष्ठिराच्या नव्या साम्राज्यसत्तेचा आम्ही प्रेमाने स्वीकार केलेला आहे अशा ढोंगी राजे लोकांच्या अंत:करणात धाक उत्पन्न केला. दण्डस्य हि भयात् सर्वं जगद् भोगाय कल्पते । हा सृष्टीत अनादि सिद्धांत आहे.

मूर्खासारख्या प्रतिज्ञेतून श्रीकृष्णानेच अर्जुनाला वाचविले. आर्य राष्ट्राचे नेतृत्व जे ब्राह्मण ते पथभ्रष्ट होऊन सत्तेचे दास बनले व धर्ममूल्यांच्या रक्षणासाठी शस्त्र हातात घेण्याऐवजी सत्तेच्या कृपाप्रसादासाठी शस्त्र सरसावून उभे राहिले. यातून मार्ग, अशांचा वध करून, श्रीकृष्णाने काढला.

**महाभारतातील एक प्रसंग**

युधिष्ठिर तंबूत परतला त्याचा पाठोपाठ अर्जुनही चौकशीसाठी आला. त्याला पाहताच युधिष्ठिर त्याला म्हणाला, काय कर्णाचा निकाल करून सांगावयास इथे आलास. अर्जुनाने  नकारात्मक मान हालविली. तेव्हा युधिष्ठिर त्याला म्हणाला - गांडीव फेकून दे त्याचा काय उपयोग ? गांडीवाचा अपमान करणाऱ्यांचा मी वध करीन अशी त्याची प्रतिज्ञा होती. लगेच धनुष्याला बाण लावला इतक्यात कृष्ण तेथे आला हे दृश्य पाहताच अर्जुनाला म्हणाला, ‘अरे हे काय चालविले आहेस. शत्रूला मारण्याऐवजी भावावर शस्त्र उगारतोस? अर्जुनाने आपली प्रतिज्ञा त्याला सांगितली. अरे ही प्रतिज्ञा युधिष्ठिराला न मारता तुला पाळता येईल. मोठ्या माणसाची निंदा करणे म्हणजे तो त्यांचा वधच आहे. अर्जुनाने निंदा केली. अर्जुनाची दुसरी प्रतिज्ञा होती, जो युधिष्ठिराचा वध करील त्याचा वध मी करीन. माझ्या हातून युधिष्ठिराचा वध झाला आहे करता मी स्वत:चा वध करीन. श्रीकृष्ण म्हणाला, अरे अर्जुना मोठ्या लोकासमोर स्वत:ची स्तुती करणे हा हा स्वत:चा वध आहे. अर्जुनाने स्वत:ची स्तुती युधिष्ठिरासमोर केली. अशाप्रकारे श्रीकृष्णामुळे फार मोठा अनर्थ टळला. मूर्खासारख्या प्रतिज्ञेतून श्रीकृष्णाने अर्जुनाला वाचविले.

भीष्म राजाधिशाला नियंत्रित करू शकला नाही. दुर्जनाच्या संरक्षणासाठी चारित्र्य संपन्नता ढाल म्हणून वापरली. ते व्यक्तिमत्त्व वंदनीय असले तरी वध्य आहे. अशांचा वध धर्म्य असल्याचे प्रतिपादन केले.

धर्ममूल्यांचा स्वसंरक्षणासाठी वापर करणाऱ्या दुर्जनासाठी, साधन शुचितेचे बंड मोडून काढून साध्यशुचितेचा व अंतिम विजयावर लक्ष केंद्रित करण्याचा मार्ग भावी भारत संतानाना दाखवून श्रीकृष्णाने दुर्जनाचे बंड मोडून काढले.

कंसाच्या वधापासून, सम्राट जरासंध वधापर्यंत विराट नगरीत पांडव प्रगट झाल्यापासून तर कुरुक्षेत्राच्या प्रचंड मैदानावर जवळजवळ चाळीस लक्ष क्षत्रियांना व सर्व राजसत्रांचा नि:पातापर्यंतचे महाभारतातील प्रकरण म्हणजे भगवान श्रीकृष्णाच्या राजकीय बुद्धिमत्तेचा व कर्तृत्वाचा रोमांचकारी इतिहास होय.

गोकुळातल्या गोकुळांच्या मेळाव्यातील अतिसामान्य जीवनात बासरी ओठाला लावणाऱ्या कमलदलासारखा मृदू हाताची केवळ एकट्याच्या बुद्धिमत्तेच्या व कर्तृत्व शक्तीच्या भरवशावर साम्राज्याची साम्राज्ये धुळीला मिळवून सहजपणे नवी साम्राज्ये निर्मिली हे पाहिले म्हणजे मन आश्चर्याने थक्क होऊन जाते.

मानव जातीला शाश्वत कल्याणाचा मार्ग दाखविणारा द्रष्टा म्हणून भगवान श्रीकृष्णाचे जे महत्त्व आहे ते शाश्वत स्वरूपाचे आहे. धर्म साम्राज्य संस्थापक श्रीकृष्ण याचे महत्त्व ऐतिहासिक स्वरूपाचे आहे परंतु श्रीकृष्णाचे महत्त्व त्रिकालाबाधीत आहे.

भगवान श्रीकृष्णानी प्रवर्तित केलेले तत्त्वज्ञान श्रीमत् भगवद्गीता या नावाने भारतीय व जागतिक वाङ्मयात स्थिरपद झालेले आहे. श्रीकृष्णाच्या तोंडून वेळोवेळी वेगवेगळ्या प्रसंगाच्या निमित्ताने अनेक तत्त्व सिद्धातांचे विवेचन आलेले आहे. प्रसंगाप्रसंगाने राजनितीच्या बरोबरच जगाच्या मूळ तत्वांची व मानवी जीविताच्या ध्येयाचीही त्यानी अनेक ठिकाणी अत्यंत मूलगामी चर्चा केलेली आहे. तत्त्वज्ञ म्हणून त्याच्या जीवनाकडे दृष्टिक्षेप टाकताना त्या सर्वच उद्गारांचा विचार करणे आवश्यक आहे. गीतेचे समालोचन म्हणजेच वस्तुत: तत्त्वज्ञ श्रीकृष्णाच्या भूमिकेचे समालोचन होय.

पिंड ब्रह्मांडाचा उलगडा करत असता प्राचीन भारतीयांनी तो असा केलेला आहे. संपूर्ण ब्रह्मांडाच्या मुळाशी ज्ञानात्मक चैतन्यतत्व असून ते चैतन्य तत्वच आपल्या इच्छाशक्तीने जगत् रूपाने नटलेले आहे. मानवी

शरीरात असलेले चैतन्य अथवा जीवभाव हा वस्तुत: त्या विश्वचैतन्याचाच अंश असून त्यानेही गोष्ट ओळखणे व त्या भावामध्ये आपले अंत:करण पूर्णपणे स्थिर करणे, हेच मानवी जीविताचे परमसाध्य होय. यालाच विश्वरूप होणे अथवा विश्वात्मक होणे म्हणतात.

शांत, समबुद्धी, सदा आनंदमय अशा रीतीच्या धारणेचा जो सर्व श्रेष्ठ पुरुष तो सिद्ध व त्याची ही अखंड धारणा म्हणजेच ब्राह्मी स्थिती होय. व्यक्तित्व विश्वरूप झाल्याने सुख दु:ख भावनेच्या अतीत अशी त्याची धारणा असते. या नि:सीम निष्काम अवस्थेला असलेली जी महान् व्यक्ती तिला स्वत:साठी काहीही मिळवावयाचे नसून अखिल भूतमात्रांच्या ठिकाणी सदैव झटणे हे तिच्या सगळया स्पंदनाचे अथवा हालचालीचे एकमात्र स्वरूप असते. स्थितप्रज्ञाची साम्यावस्था ती भगवान् श्रीकृष्णाच्या ठिकाणी जन्मत:च सिद्ध असून विश्वाच्या अणुरेणुशी ते पूर्णपणाचे एकात्मभाव असलेले होते.



नारायणीय अथवा भागवत धर्म सारखेपणाने साररूपाने श्रीमत् भगवद्‌गीतेत सांगितला आहे.

**श्रीकृष्णाचे तत्त्वज्ञान**

श्रीकृष्णाचे तत्त्वज्ञान हे मानव जातीला मिळालेली अप्रतिम भेट आहे. श्रीमत्‌भगवद्‌गीता हा श्रीकृष्णाकडून जगाला मिळालेली अमूल्य देणगी आहे. श्रीकृष्णअवताराची जर काही विशेषता असेल तर तो त्याचा गीता बोध. गीतेचे तत्त्वज्ञान आज पाच हजार वर्षे उलटली तरीही जगाला मार्ग दाखवीत राहिले आहे. आज जगाला त्याची जितकी गरज आहे तितकी गरज क्वचितच कधी भासली असेल हे तत्त्वज्ञान नूतन आहे. कधी जुने होत नाही. अशा अद्‌भुत ग्रंथाविषयी देखील काही लोक शंका कुशंका व्यक्त करीत असतात व स्वत:च्या बुद्धीचे ते प्रदर्शन करतात.

श्रीकृष्णाने जगाला मार्गदर्शन करण्यासाठी व स्वत:चे तत्त्वज्ञान समजावण्यासाठी गीता सांगितलेली आहे व त्याचे तत्त्वज्ञान एवढे उच्च कोटीतले आहे की त्यामुळेच आज जगातील सर्व धर्मग्रंथात व तत्त्वज्ञानाच्या ग्रंथात तिला अग्रस्थान प्राप्त झालेले आहे. गीता दीपस्तंभाप्रमाणे तत्त्वज्ञानाचे मार्गदर्शन करायला उभी आहे.

मानवाच्या कोणत्याही वंशाच्या इतिहासाची दखल घेतली तर ध्यानात येईल की तो संघर्षाने भरलेला आहे. निवृत्ती व प्रवृत्ती यांच्या मधील झोंबाझोंबी तर अनादिकाळापासून चाललेली आहे. पण जेव्हा प्रवृत्ती आणि निवृत्तीमध्ये समन्वय घडतो तेव्हाच तो मानव समाजाच्या विकासाची अतिशय उंची गाठतो. केवळ निवृत्ती वादी वा केवळ प्रवृत्तीवादी व्यक्ती अथवा समाज, विकास करू शकत नाहीत. विकास हा समन्वयानेच साधता येतो. श्रीकृष्णाने गीतेत हेच तत्त्व सांगितले आहे. कोणत्याही गोष्टीचा अतिरेक होता कामा नये. हाच खरा विकासाचा मार्ग. मानव हा मार्ग स्वीकारून चिरकाळ उन्नती साधू शकतो आणि अशा विकासा करता योग्य मार्गदर्शक जर कोणता ग्रंथ असेल तर तो एकमात्र 'गीताग्रंथ' आहे.

अति प्रवृत्ती वा निवृत्ती म्हणजे अध:पतनच होय. मात्र या उभयतांचा समन्वय म्हणजे उत्कर्ष, विकास आहे. मानवी इतिहासाचा अभ्यास केल्यावर असे स्पष्ट दिसून येते की जगाला नेहमी एका तिसऱ्याच प्रवाहाची गरज राहिलेली आहे. आज मानव अर्थालाच जीवनाचे सर्वस्व मानत आहे. त्यामुळे त्याचे वरचेवर अध:पतन होत आहे. या परिस्थितीतून मानवाला योग्य विचार देऊन पतनापासून चिरकाली उपाय सांगून त्याची उकल करण्याची

आवश्यकता आहे.

तो आहे चिरकालीन आत्मिक चैतन्याचा विचार. म्हणजेच दैवी संस्कृतीची ओळख. याच्या परिचयाने पुनरपि मानव चिरकालीन संस्कृतीशी समरस होऊ शकेल. श्रीकृष्णाने ही चिरकालीन भेट गीतारूपाने मानवाला दिलेली आहे. आत्मिक चैतन्यमय संस्कृतीच मानवता वाचवू शकते, मानवता वाढवू शकते. श्रीकृष्णाने आपल्याला ही गोष्ट समजावून सांगितली आहे. त्यातून कर्तव्याचा महिमा समजावला आहे. हक्क व अधिकार यांच्या संघर्षात न पडता कर्तव्यासाठी कर्तव्याचा विचार करा. तो केल्यासच मानवाची उन्नती होईल. जगात मानवता वाढीला लागेल.

आज सारी मनोवृत्ती बदललेली आहे. सर्वजण आपआपल्या हक्काची व अधिकाराचीच गोष्ट करीत आहेत. स्वत:च्या कर्तव्याबद्दल कोणाला आवश्यकता वाटत नाही. हक्काने, कायद्याने अधिकाराने मुलगा बापाच्या मिळकतीचा मालक होण्याचा प्रयत्न करीत असतो. बापाबद्दलच्या कर्तव्याचे त्याला स्मरणच होत नाही. बापाचे काही ऐकावयाचे नाही असा आज हक्कासाठी संघर्ष होत राहिलेला आहे. श्रीकृष्ण सर्व मानवांना कर्तव्याची जाणीव करून देत आहेत

अधिकारापेक्षा कर्तव्य ज्यादिवशी मोठे होईल तेव्हाच संघर्ष संपेल. जीवन विशाल होईल. जीवन उन्नत होईल. प्रत्येक विचारामागे ईशसत्तेच्या अस्तित्वाची जाण आवश्यक आहे. तो असेल तर धर्म, नीती यांचा आवर्जून विचार राहील. त्यातून कर्तव्य जाणीवेची प्रेरणा मिळत राहील. निरपेक्ष बुद्धीने कर्तव्य करण्याची अभिरूची राहाते. उन्नतीचे मार्गदर्शन अशा विचारामुळे होऊ शकेल. समाजात नैतिक सांस्कृतिक निष्ठा वाढीला लागेल. जो मानव स्वत:च्या कर्तव्याचे पालन करीत नाही त्याचे जीवन व्यर्थ आहे. गीता सांगते अघायु: इंद्रियाराम: मोघं पार्थ स जीवति। भौतिकवाद हक्काला प्राधान्य देतो व सांस्कृतिक जीवन कर्तव्याची प्रेरणा देतो.

श्रीकृष्णाने या वैश्विक समस्येमागे असलेले ईश्वरीय अधिष्ठान देऊन नीती व सत्याचे वर्तन करणारा, प्रगाढ आत्मविश्वासाने वागणारा मानव निर्माण करण्याचा विचार मांडला आहे. कल्याणकारी विचार करणाऱ्यांची कधीही अधोगती होत नाही. न हि कल्याणकृत कश्चित् दुर्गतिं तात गच्छति।

**राजकारण, तत्त्वज्ञान**

राजकारणताही अशीच वस्तुस्थिती आहे. राज्यशास्त्र व राजकारण या विषयावरून महाभारतात भगवान् श्रीकृष्णाचे म्हणून जे जे विचार व्यक्त झाले आहेत ते चिरंतन स्वरुपाचे आहेत. यश आणि श्रीकृष्ण यांची जणू सांगड घातलेली आहे. इतके फलदायी कर्तृत्व त्याच्या जीवनात दृष्टीस पडते. तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात केवळ सातशे श्लोकातील संवादावरून जगताच्या या महान नेत्याचे विचार आकलन करून घेताना प्रत्येक संप्रदायाने आपआपल्या परी अर्थ लावला आहे. श्रीमत् आद्य शंकराचार्य व इतर आचार्य, लो. टिळक योगी श्री अरविंद, डॉ. राधाकृष्णन्, ॲनी बेझंट, म. गांधी आदी भारतीय श्रेष्ठ पुरुषावर या तत्त्वज्ञानाचा प्रभाव पडलेला आहे. श्रीकृष्णाच्या म्हणण्याचा निश्चित अर्थ काय या संबंधीचे प्रश्नचिन्ह अद्याप अल्पांशानेही पुसट झालेला नाही. (क्रमश:)

**शं. बा. मठ**
६, कुमार आशिष,राम मारुती रोड,
ठाणे - ४०० ६०२.

# डॉ. मो. दि.पराडकर यांचे आत्मकथन

**भाग - ३**

१९४२ साली मी इंटरला होतो, त्यावेळेला 'राष्ट्रभाषा कोविद' झालो. ही परीक्षा योगायोगाने (!) पहिल्या वर्गात पहिल्या क्रमाकांने उर्त्तीर्ण झालो. भारतात पहिला येण्याचा मान मी या राष्ट्रभाषा प्रचारसमितीच्या परीक्षेत मिळवला. यामुळे आमच्या म्हणजे आर्. एग्. भट हायस्कूलला मोठं श्रेय मिळालं. पुढे मुंबईचे मेयर झालेले मो. वा. दोंदे हे आमच्या शाळेचे प्राचार्य. त्यांचं माझं अगदी घरातलं नातं होतं. त्यांच्या शाळेतल्या हिन्दी केन्द्रातून मी ही परीक्षा दिली. आम्हाला शिकवणारे जे मुळे म्हणून शिक्षक होते ते आणि मी मिळून कोविदच्या पुस्तकांची टिपणं काढली. साहजिकच मला चांगल्या रीतीने पेपर्स लिहिता आले. शाळेला महत्व मिळाल्यामुळे आमच्या मुळेमास्तरांनी आम्हाला सांगितल की आता तुम्ही शिकवायला सुरुवात केली पाहिजे. म्हणून मी प्रचारवर्गामधे शिकवायला प्रारंभ केला. रुईया कॉलेजमधे मात्र माझा हिंदीशी असा संबंध आहे, याची कल्पना माझे दोन - चार निकटचे स्नेही सोडले तर कुणाला नव्हती आणि कुणाला सांगण्याचे प्रयोजन मला वाटले नाही. तिथल्या लोकांना मी हिंदीचा प्रचार करतो हे कानांवर आलं होतं, पण मी हिन्दीमधे बोलू शकतो आणि चांगलं बोलू शकतो हे त्यांना माहित नव्हतं. वारशामुळे मला हैद्राबादचा लहजा (उच्चारण्याची पद्धत) मिळला त्यामुळे हिंदीमधे उर्दूचा येणारा जो थाट आहे तो आपोआप येत असे. हा आणखी एक योगायोग. कारण मी काही उर्दूचा मुद्दाम अभ्यास केला नव्हता. प्रचारवर्गामधे केला, तो सोडा! पण १९५७ साली आमचे इतिहासाचे प्राध्यापक राव यांनी Debating Society तर्फे एक समारंभ केला आणि त्या लो. टिळकांच्या 'गीतारहस्य' वर निरनिराळ्या भाषांमधे बोला अशी सूचना मांडली. मग 'गीतारहस्यावर' हिंदीत बोलण्याचं काम कुणी करायचं, असा प्रश्न आल्यावर रावांनी सांगितलं ''पराडकर, हे काम तुमचंच आहे ! '' मी म्हटलं हा विषय संस्कृतचाच आहे, त्यामुळे बोलेन की ! तेव्हां ५७ साली योगायोगानं रुईयामधे प्रथम व्याख्यान मी हिंदीत दिलं. लोकांना ते इतकं आवडलं, की मला आमचे हिंदीचे प्राध्यापक जैन म्हणाले, ''आप इतनी अच्छी हिंदी बोलते हैं, यह हमें मालूम नही था । आपका लोहा निस्संदेह मानना पडेगा ।' त्यामुळे मला चांगलं हिंदी बोलता येते हे कळायलाही रुईया महाविद्यालयात १२ वर्षे (१९४५ ते १९५७) लागली. मला अर्थात त्याची गडबड नव्हती. बाहेर मी प्रचारवर्गांना शिकवत होतो. सकाळी आटपून मी ठाण्याला घरी जाई आणि पुन्हा संध्याकाळी ६च्या वर्गाला दादरला येत असे. वनमाळी हॉलमधे हे वर्ग होत. इकडे माझा संस्कृत हा अभ्यासाचा नि शिकवण्याचा विषय असल्यामुळे मला लोक 'साहित्य' हा विषय शिकवयला द्यायचे. वाङ्मय काय, अलंकार म्हणजे काय, इत्यादि ही माझाच विषय. त्यामुळे तो मी चांगला शिकवीत असेही म्हणण्याचं खरं कारण नाही. वाईट शिकवणंच अडचणीचं होतं. साहित्यिक हिन्दीत बोलणं हे साहित्यिक मराठीत बोलण्यापेक्षा फार वेगळं नसतं. फक्त रचनेचा प्रश्न असतो. वाचनामुळे मला तोही प्रश्न आला नाही. आज ह्या प्रचारवर्गांना इतर सर्व गोष्टींप्रमाणे व्यापारीकरणाचा स्पर्श झाला आहे. त्यावेळी मात्र प्रचाराचा खरा उत्साह आम्हा सर्वांना होता. आमच्या दृष्टीनं त्यावेळी हिन्दी हा उत्पन्नाचा भाग कधीच नव्हता. आमच्या दृष्टीनं तो भारतातल्या सर्व भिन्न भाषिकांना जोडणारा एक दुवा होता. आम्ही हिंदीचा प्रचार ह्या निष्ठेनं करीत होतो. त्यामधून

पैसा मिळावा अशी अपेक्षाच आम्हाला नव्हती. आमचाच पैसा खर्च व्हावा असा योग होता ! पण झालं असं की आमच्या सगळ्या प्रचार संस्थांमधे -'महाराष्ट्र राष्ट्रभाषा', राष्ट्रभाषा प्रचार समिती' व 'मुम्बई हिन्दी विद्यापीठ' - 'आपला' मनुष्य. हा 'त्यांचा' मनुष्य असे प्रकार असत, आजही थोड्याफार प्रमाणावर आहेत. पण व्यक्तिशः माझ्या एकंदर हिन्दीच्या अभ्यासामुळे माझ्यावर असा कुणी शिक्का मारु शकलं नाही. तरीसुद्धा शिक्का मारणारे लोक त्यावेळी होते. किंबहुना एक प्रसिद्ध गृहस्थ (आता ते दिवंगत असल्याने त्यांचे नाव घेत नाही) असं म्हणाले होते. 'हे मुंबई हिन्दी विद्यापीठाचे आहेत!' मला अर्थात त्याची काही पर्वा नव्हती. पण त्यानी असाही प्रचार केला की 'पराडकरांच्या लेक्चरला जाऊ नका' कुणाला खरं वाटणार नाही आता ! आणि कारण काय तर मी म्हणे महाराष्ट्र राष्ट्रभाषा सभेचा नाही ! त्यांचं दुर्दैव असं की व्याख्यानाला येणाऱ्या लोकांची गर्दी त्यामुळे कमी झाली नाही ! मुलांनी त्यांना परस्पर असं सांगितल की पराडकरांच्या व्याख्यानात कधी संस्थेचा उल्लेखही येत नाही... आणि खरंच मला असा उल्लेख करण्याचं कारण नव्हत. मैथिलीशरण गुप्त हे हिन्दीचे कवी. ते कुठल्या संस्थेचे याचा संबंध काय? त्यांच्या कवितेवरच बोलायचं !(?) त्यांनी एकदा व्याख्यान ठरवलं, जयशंकर प्रसादांनी व्रज भाषेत कविता केली. नंतर ते खडी बोलीकडे आले आणि त्यांच्या खडी बोलीतल्या काव्यांची इतिहासानुसार सनावली देऊन मी त्यांच्या काव्याचा विकास कसा होत गेला हे सांगितलं. प्रसाद यांच शेवटचं काव्य 'कामायनी' हे प्रसिद्ध आहे त्यावर येऊन मी थांबलो. माझ्या वर्गातल्या विद्यार्थिनींनी त्या दिवशी घरी जाऊन सांगितल की आजचं व्याख्यान ज्यांनी ऐकलं नाही ते करंटे ! मला यात काही विशेष वाटायचं नाही. कारण ग्रंथालय मला उपलब्ध होत. प्रचारकाला एरवी ते कसं मिळावं ? माझा गुण असेल तर एव्हाढाच, की मला उपलब्ध असलेल्या सर्व गोष्टींचा उपयोग करुन बोलत होतो. त्यामुळे मी जे बोलतो त्याची कीर्ति फार पसरत असे. एक्दां असं घडलं की वृंदावनलाल वर्मा म्हणून एक ऐतिहासिक उपन्यासकार आहेत, त्यांचा 'अहिल्याबाई' नावाचा उपन्यास परीक्षेला लावला होता. त्याच्यावर मला व्याख्यान देण्यास सांगितलं गेलं. त्यामुळे मी वृंदावनलाल वर्मा सगळाच वाचला. हा बुंदेलखंडाचा उपन्यासकार आहे. त्याच्या बुंदेलखंडातल्या कादंबऱ्या फार चांगल्या आहेत. ऐतिहासिक असून 'अहिल्याबाई' मधे ते इतके रमलेले दिसत नाहीत. कारण त्यांना इथल्या इतिहासाची तेवढी माहिती नव्हती. त्यामुळे मी वर्गात बोलताना सांगितें की या वस्तुस्थितीमुळं नोंदी सगळ्या झाल्या, पण त्या इतिहासाच्या नोंदी कादंबरीच्या स्वरूपामध्ये कथात्मक एकरसतेने आल्या नाहीत. त्यामुळे झालं असं की त्यांच्या प्रतिभेची जी जाणीव त्यांच्या 'कचनार' किंवा 'मृगनयनी' मधे होते ती इथे होत नाही. तिथे जे प्रचारक शिक्षक होते ते व्याख्यानानंतर मला म्हणाले, तुम्ही हे सगळं या व्याख्यानासाठी वाचलंत ? म्हटलं, आता व्याख्यानासाठी वाचलं असं जरी म्हणता आलं नाही तरी वाचलं एवढं खरं. या व्याख्यानासाठी केवळ मला एवढं वाचण्याची काहीच गरज नव्हती. पण मला ती हौसच आहे.

नंतर एकदा आमच्या रुईया महाविद्यालयामधे न. र. फाटकांनी 'उच्च शिक्षणाचं माध्यम कुठलं असावं' यावर एक परिसंवाद ठेवला. त्या वेळेला उच्च शिक्षणामधे हिन्दी जर अनिवार्य केलं, तर निदान त्यांचा उच्च शिक्षणाची, अभिव्यक्तीची भााष हिन्दी होऊ शकेल आणि मराठी माणसाला उच्च शिक्षणाच्या विषयांमधे हिन्दी वापरणं कठीण नाही कारण परिभाषा संस्कृतमधलीच आहे. त्यामुळे परिभाषेचा प्रश्न येणारच नाही, असा विषय मी मांडला. फाटक मला म्हणाले की विषय तुम्ही इतक्या कौशल्याने मांडलाय की तुमचं व्याख्यान लोकांना सर्वाधिक आवडलं हे दिसतच होतं. मी म्हटलं, ''खरं सांगायच म्हणजे महाराष्ट्रात मी मराठीच्या बाजूचा आहे आणि त्याच्यासाठी सर्व अप्रियता पत्करली आहे.'' पण तरीसुद्धा मी तो विषय

मांडला. फाटक मला म्हणाले, ‘तुम्ही ज्या तडफेनं हिन्दी बोलता त्या तडफेनं हिन्दी बोलणं कठीण आहे. ’’ ते सुद्धा खरं तर हिन्दीचे मर्मज्ञ होते पण म्हणाले,‘ इतक्या तडफेनं हिन्दीत बोलणं मलासुद्धा शक्य नाही.’

माझा हिन्दीचा दुसरा एक फायदा असा, की माझे संस्कृतमधले गुरु रं. रा. देशपांडे यांनी मला म्हटलं, ‘मला कोविद व्हायचंय, पण मी वर्गात जेव्हा प्रचारक शिक्षकांना ऐकतो, तेव्हा तुम्ही सांगता त्यातलं काहीच तिथे ऐकायला मिळत नाही. ’’ मी म्हटलं, ‘‘जाऊ द्या हो, असं आहे की प्रत्येक प्रचारकाला हे कसं कळणार ? सूरदासाचं एखादं पद असेल तर त्या पदामागची सूरदासाची भावना काय आहे हे त्याला कसं सांगता येणार ? मला सांगता यायला पाहिजे कारण ‘साहित्य रत्न’ या साठी माझा ‘सूरदास’ हा विशेष विषय होता.’’ ते म्हणाले, ‘‘ ते सगळं ठीक आहे’’ देशपांडे इतका प्रामाणिक माणूस की त्यांनी कॉमनरुममधे सांगितलं की ‘‘गुरुऋण म्हणून जर काही असेल तर पराडकरांनी मला हिन्दी शिकवून फेडलेलं आहे. मी संस्कृत त्यांना शिकवलं असेल. पण हिन्दी ते स्वतः अशा प्रेमाने शिकलेले आहेत आणि शिकवलयं मला, की आता मी अगदी समाधानात आहे.’’ याचा असा जाहीर उच्चार हे माझ्या गुरूचे सौजन्य स्मरणीयच.

१९५७ च्या माझ्या या भाषणाचा परिणाम असा झाला की आमचे प्राचार्य, उपप्राचार्य यांनी असं सांगितलं की आम्ही पराडकरांना हिन्दी शिकवायला सांगू इच्छितो. त्यांनी शिकवलं तर त्यांनीच सांगितल्याप्रमाणे विद्यार्थ्यामध्ये हिन्दी विषयी आस्था निर्माण होईल, असं आम्हाला दिसतं. आमचे गुरुजी व्यवहारी होते. त्यांनी असं विचारलं की ‘तुम्ही त्याचा त्यांना, वेगळा मोबदला देणार आहांत का ? तुम्ही त्यांना १५ लेक्चर्स संस्कृतचे आणि ५ लेक्चर्स हिन्दीचे घ्यायला सांगाल तर मला चालणार नाही. कारण माझा संस्कृतचा विद्यार्थीवर्ग कमी करायला मी तयार नाही. कारण पराडकरांची ५ लेक्चर्स कमी होणं म्हणजे संस्कृतचं महत्व तेवढं कमी होण असं मी समजतो. पराडकरांचं स्थानच असं आहे की याला उपाय नाही. तेव्हा मोबदला निराळा देणार असाल तर ठीक otherwise I am not ready to spare my man for your (!) HIndi/"

अर्थात् ते सुदैवानं बारगळलं.

संस्कृत विभागातर्फे आम्ही त्या काळात उतके उपक्रम केले की त्यामुळे माझी एखाद्या कार्यक्रमातही उपस्थिती आणि अनुपस्थिती उल्लेखनीय ठरत होती. असं असताना ५८ साली ती गोष्ट घडली ....

१९५८ मधे असा प्रसंग आली की आता नुकतेच दिवंगत झालेले राम जोशी आमच्या महाविद्यालयात आले. ते आले तेव्हा Civics & Politics असा एक विभाग होता ते Politics विभागामध्ये लेक्चरर म्हणून आले. पण ते होते प्रजा सोशालिस्ट आणि प्रजा सोशालिस्ट म्हणून ते मुंबई महानगरपालिकेचे सदस्य म्हणून निवडून आले. ते शिकवत चांगलेच. त्यांचं वक्तृत्व उत्तमच होतं. त्यामुळे ते शिक्षणसमितीचे अध्यक्ष झाले. हा कॉलेजबाहेरचा विषय आहे. पण त्याचा प्रभाव असतोच. त्यामुळे आमच्या शिक्षण प्रसारक मंडळीनं असं ठरवलं, की त्यांना Politics हा नवीन विभाग उघडून प्रोफेसर पद द्यायचं. प्राध्यापकाचं पद याचा अर्थ हेड ऑफ द डिपार्टमेंट हा प्रोफेसर असावा असा संकेत. त्यावेळेला प्रोफेसर व लेक्चरर यांच्यामध्ये बढतीच्या दृष्टीनं महिन्याला ५ रुपयांचा फरक असे. व्याख्यात्याची सुरुवात २५० पासून होई. प्राध्यापकाची सुरुवात ३५० पासून . तेव्हा राम जोशींना प्रोफेसर करण्याचा निर्णय शि. प्र. मंडळीने अमलात आणला. त्यांच्या पेक्षा व्यवसायानं ज्येष्ठ असणारी माणसं माझ्यासह त्यावेळी रुईयामधे १०-१२ होती. मी त्यांना सगळ्यांना असं सांगितलं की मला हा अपमान वाटतो. व्यक्तीचा प्रश्न नाही. पण आम्ही १२-१२ वर्ष काम केलेले लोक आहोत. तेव्हा आम्ही सर्वांनी मिळून एक अर्ज केला. आम्ही मंडळाला

असं सांगितल की आम्हाला तुम्ही प्रोफेसरांच्या ग्रेड मधे टाका. कारण आता काय झालंय, तुम्ही एक नवीन डिपार्टमेंट काढून बाहेरच्या प्रतिष्ठेमुळे आमच्यापेक्षा कनिष्ठ (सेवेनुसार) माणसाला प्रोफेसर करीत आहात. याच्यापूर्वी अशा गोष्टी झाल्या होत्या, की एखाद्या विभागाचा अध्यक्ष काही कारणाने (बाहेर चांगली ऑफर मिळाल्याने) गेला तर दुसरा मनुष्य अध्यक्ष होत असे. स्वाभाविक तो आमच्याच वयाचा नि आमच्याच आसपासचा असला तरी आम्ही कधी त्याबद्दल तक्रार केली नाही. व्यक्तिशः मी तर नाहीच कारण मला यामधे फारशी रुची नव्हती. पण हा प्रश्न आता प्रतिष्ठेचा झाला होता, आणि प्रतिष्ठेच्या बाबतीत मी तडजोड करायला तयार नसतो. त्यामुळे मी यात पुढाकार घेतला. प्रोफेसरच्या ग्रेडमधे आम्हाला टाकणं याचा अर्थ बारा पंचे साठ रुपये वर्षाला जास्त देणं एवढाच होता. कारण आम्हाला वेतणश्रेणी चालूच होती. २५० चे आमचे ३५० केव्हाच झाले होते. माझे आणखी दोन जास्त झाले होते कारण मी मधे पी.एच.डी. झाल्यामुळे दोन प्रमोशन्स मला जास्त मिळाली होती. तेव्हा मी तेव्हा ३७० मधे होतो. या अर्जावर आम्ही सर्व प्रोफेसरांच्या सह्या घेतल्या आणि तो अर्ज पाठवायचं ठरलं. तुम्हाला आश्चर्य वाटेल पण राम जोशी तेव्हा असं म्हणाले की मी सुद्धा सही करतो अर्जावर. मी सांगितलं आम्हाला त्यांची सही चालणार नाही. तत्त्वतः आम्हाला त्यांची सही घेऊन वेतनवाढ नको आहे. त्यांना कल्पना नव्हती, आम्ही असं म्हणू.

झालं, तो अर्ज गेला. अपेक्षेप्रमाणे तो नामंजूर झाला. शिक्षण प्रसारक मंडळ काही मूल्यं पाळत नाही असं दृष्टोत्पत्तीस आलं. मी मग आमचे गुरू रं. रा. देशपांडे यांना सांगितलं, ''सर, माझी रुईयामधे शिकवण्याची रुची संपली. कारण इथे शिकवण्याला किंमत नाही, असं दिसतंय. तेव्हा आता इथे रहाण्यात रुची नाही.'' शिकवण्यातली रुची नाही असं म्हणणं बरोबर नाही, कारण शिकवणं हे आपलं कामच आहे. ते काम चांगल करणं असं अभिप्रेतच आहे.'' चांगल्या शिक्षकाला चांगलं काम करतो म्हणून सत्कार ही कल्पनाच मला पसंद नाही. काम आपलं काम चांगल करतो एवढच होतं. पण हल्ली त्यालाही सत्कार करतात! मी गुरुजींना म्हटलं, 'मी शिकवण्याचं काम व्यवस्थित करतो, पण मला निषेध करण्यासाठी मला तुमचं सहकार्य हवयं'' देशपांडे म्हणाले, 'माझं सहकार्य? माझं सहकार्य तुम्हाला मिळेलच. कारण तुम्ही इतका स्वाभिमान जपता, ही माझ्या दृष्टीने फार मोठी गोष्ट आहे. काय सहकार्य पाहिजे, ते सांगा.'' मी म्हटल, 'मी महाविद्यालयाच्या अधिकृत समारंभांना उपस्थित राहणार नाही. तुम्ही त्या बद्दल खंत बाळगायची नाही. संस्कृतच्या समारंभाला सुद्धा हजर राहणार नाही. कारण तोही अधिकृतपणे महाविद्यालयाचाच. तुम्ही प्राचार्यांना बोलवणार. उपप्राचार्यांना बोलवणार. '' ते म्हणाले, '' पराडकर, हे सगळं चांगलं नाहीये, पण मला मान्य आहे. मी तुमच्या अभिमानी निर्णयाचं स्वागत करतो आणि मी मिटिंगमध्ये स्वच्छ सांगितलं आहे, आमचे हे शि. प्र. मंडळीचे सगळे लोक पाषाण आहेत. त्यांच्यावर कुठला संस्कारच होत नाही !'' असं माझ्या गुरुंचं मला मिळालेलं सहकार्य हा मोठा विषय आहे. माझ्या अनुपस्थिती बद्दल काय सांगायचं तेही तेच सांगत !

मला एकदा आमचे उपप्राचार्य भेटले ते म्हणाले, '' हल्ली तुम्ही समारंभांना दिसत नाही ? '' मी एवढचं म्हटलं, '' हो, जरा काम असतं'' त्यांना खर कारण सांगून मला काय मिळणार?

पुढे माझ्या गुरुंनी विचारलं, ''तुम्ही हे असं किती दिवस चालवणार? पुढे तुम्ही काय करायचं ठरवलयं ? मी आहे तोपर्यंत प्रश्न नाही. पण माझ्यानंतर क्रम तुमचाच आहे.'' मी म्हटलं, ''बघू, मला बाहेर कुठेतरी बोलवल जाईल आणि मग मी जाईन. क्यू मधे मला उभं रहावं लागणार नाही. संस्कृत जगतात माझी तेवढी प्रतिष्ठा निर्माण झाली आहे.''

आमचे मामा आणि ज्योतिषाचे, हस्तसामुद्रिकाचे जाणकार श्री. तांबे यांना मी व्यक्तिगत पत्र लिहिलं की ''अशीअशी परिस्थिती आहे आणि मन नसताना मी काम करतो आहे. माझ्या विद्यार्थ्यांना यातलं काही कळलेलं नाही पण मला असं वाटतं की याउपर मी इथे न राहणं चांगलं.'' ते जाणकार असल्यामुळे त्यांनी सांगितलं,''तुम्ही काळजी करु नका. पुढच्या वर्षीच्या जूनमधे तुम्ही रुईयामधे नसाल. हे मी तुम्हाला बरं वाटावं म्हणून सांगत नाही. पण तुम्हाला बोलावणं येईल आणि तुम्ही जाल.''

आताची ही जागा आहे ती मी त्यावेळी अशासाठी घेतली होती की मला जे लोकलनं यावं-जावं लागत असे ते टळावं. पण आमचे मामा म्हणाले की, ते मी तुम्हाला सांगितलेलं नाही. मी एवढं सांगतो की रुईयामधे तुम्ही नसाल. तुमच्या कुंडलीतल्या ग्रहरचनेप्रमाणे सांगायचं तर तनूला कष्ट असतात. त्यामुळे तुमच्या नशिबाची लोकल सुटणार नाही.

असं करता करता १५ जून उजाडला २० जूनच्या आत नोटीस तर द्यायला पाहिजे. कायद्याप्रमाणे परीक्षांचे सुपरव्हिजन वगैरे नित्याप्रमाणे चालूच होते. मी त्यांना १२-१३ जूनला पत्र पाठवलं होतं पुण्याला. त्यांचं उत्तर आलं की अजून ७ दिवस आहेत ! आणि ७ दिवसात भूगोल उलथता येतो. तेव्हा तुमच्या नोकरीचे काय !!

आणि काय आश्चर्याची गोष्ट आहे ! १६ जूनला मला सोमैय्या कॉलेजच पत्र आलं. आमच्या रुईयामधून याज्ञिक नावाचा गुजराथीचे प्रोफेसर तिकडे प्रिन्सिपॉल म्हणून लागले होते. त्यांनी सोमैय्यांना सांगितल की तुम्हाला संस्कृत विभाग जर उघडायचा असले तर मुंबईमधे पराडकरांसारखा मनुष्य नाही. तेव्हा तुम्ही त्यांना बोलवा. अर्ज करतील तेव्हा करतील; पण तुम्हाला बोलवायला पाहिजे, तर ते येणार ! झालं. माझा इंटरव्ह्यू झाला. मला म्हणाले, ''तुमची पगाराची अपेक्षा काय आहे ?' मी म्हटलं, ''पगाराची अपेक्षा वगैरे काही नाही. या वर्षी मला रुईयामधे जेवढं मिळालं असतं, ते मिळावं आणि प्रोफेसरची ग्रेड मिळावी.'' '' ते तुम्हाल मिळेलच पण इतर तुमची काहीही अपेक्षा नाही ?'' मी म्हटलं, ''काहीही नाही; रुईया कॉलेज मी प्रतिष्ठेसाठी सोडतोय. पैशासाठी नाही. पैशाची माझी अपेक्षाही नाही पण माझी प्रतिष्ठा सांभाळली जावी असा माझा आग्रह आहे. ते याज्ञिकाना माहितच आहे. केवळ ६० रुपयांसाठी तुमच्यासारख्या माणसाला सोडायला ते प्रवृत्त झाले. हे मी समूजच शकत नाही!'' रुईयामधे त्यावर्षी पर्यवेक्षक मी, प्रिन्सिपॉल मूर्तींच्या हातात माझे राजीनाम्याचे पत्र ठेवले. त्यांचे माझे व्यक्तिगत संबंध चांगले होते. त्यांनी विचारल्यावर मी त्यांनाही सांगितले की पैशासाठी मी जात नसून प्रोफेसरच्या ग्रेडसाठी म्हणजे पर्यायाने प्रतिष्ठेसाठी मी तिकडे जातो आहे. मूर्ती म्हणाले,'' मी प्रिन्सिपॉल असताना तुम्हाला सोडावं लागावं यासारखं मला दुःख नाही. You are and you have been the Best Teacher here. मी म्हटलं, Sir, Permit to me say that in our society i.e. S.P. Mandali, good teachers are Superfluous !" त्यांना दोन मिनिटं बोलता येईना. कारण मी इतके स्पष्ट बोलेन अशी त्यांना कल्पना नव्हती ! मग म्हणाले, "Paradkar, what you say is unfortunatly true" But this is not good for society ! Society will have to suffer for you. मी यावर काय बोलणार होतो!

पुढे मंडळीला असं वाटलं की जर मी कॉलेज सोडलं तर माझ्यापक्षा जास्त पात्र व्याख्याते ज्यांना अजून बाहेरची ऑफर आलेली नाही, तेही सोडतील. अशी आठ-नऊ माणसं त्यावेळी रुईयात होती. तेव्हा मंडळीने त्या सर्वांना प्रोफेसरची ग्रेड दिली आणि तीसुद्धा असं सांगत की, 'There will be an Exodus from our college to offer colleges. We can not suffer such a loss.' आमचे नांदुर्डीकर म्हणून एक व्याख्याते होते.

*(पान क्र. २४ वर)*

# महाभारतातील समस्या

*महाभारत हा ग्रंथ कृष्णद्वैपायन व्यासांनी लिहिला. आजदेखील महाभारत हा एक अत्युत्कृष्ट ग्रंथ मानला जातो. त्यात राजनीती, तत्त्वज्ञान, तत्कालीन अध्यात्मिक प्रगती, आचार, शिक्षण, चालीरीती याचे प्रतिबिंब पडलेले आढळते. किंबहुना त्यातून त्याकाळच्या परिस्थितीचे बहुतांश चित्र आपल्या डोळ्यासमोर उभे राहते. या महाभारतातील समस्या फार गहन आहेत. त्यातील काही समस्यांचा विज्ञान शाखेतील विद्यार्थिनींनी फाऊंडेशन कोर्सच्या प्रोजेक्टच्या निमित्ताने केलेला हा विचार. - संपादक*

समस्या - महाभारतकालीन व्यक्तींची वयोमर्यादा?

स्वरूप - महाभारतातील सगळ्यात महत्त्वाचे निर्णायक युद्ध हे महायुद्ध मानले जाते. या युद्धात पांडव आणि कौरव पक्षातील विविध व्यक्तींनी भाग घेतला. या युद्धात या प्रमुख व्यक्तीची वये काय असावीत? त्यानुसार तत्कालीन वयोमर्यादा काय होती? ती वयोर्मादा आणि आजचे सरासरी आयुर्मान समान आहे का? जी वये आपल्याला अविश्वसनीय वाटतात ती त्याकाळी होती. काही व्यक्ती तर पिढ्यान्‌पिढ्या जगलेल्या आढळतात हे शक्य आहे का?

महाभारतातील ज्या व्यक्तींचा येथे विचार केला आहे त्या म्हणजे भीष्म, परशुराम होत.

माणसाच्या जन्माबरोबरच एक अटळ गोष्ट त्याच्या भविष्यात लिहिलेलीच असते ती म्हणजे मृत्यू. मानवाची सरासरी आयुमर्यादा सध्याच्या काळात ६० ते ७० वर्षांची आहे.

महाभारतातील युद्धकाली भीष्माचे वय किती असावे?

भीष्माचे वडील शंतनू यांनी मत्स्यगंधेशी विवाह केला तेव्हा भीष्म युवराज होता. धनुर्विद्येत पारंगत होता. शिवाय त्याने कधीही विवाह न करण्याची प्रतिज्ञा केली होती. तेवढी मानसिक प्रगल्भताही त्याच्यापाशी होती. तेव्हा त्याचे वय कमीत कमी १६ वर्षांचे असावे. त्याची सावत्र आई सत्यवती हिला चित्रांगद आणि विचित्रवीर्य नावाचे दोन मुलगे. यापैकी चित्रांगद लढाईत मारला गेला. विचित्रवीर्य अंदाजे दोन वर्षांनी झाला असे धरले तर तेव्हा भीष्माचे वय १८ वर्षांचे होते. विचित्रवीर्याचा विवाह १६ व्या वर्षी झाला असे धरले तर तेव्हा भीष्माचे वय होते ३४ वर्षांचे. लग्नानंतर काही काळातच विचित्रवीर्य मरण पावला. वंश टिकून रहावा यासाठी सत्यवतीने भीष्माला विवाहाचा आग्रह धरला परंतु भीष्म बधला नाही. म्हणून व्यासांनी अंबिका, अंबालिका आणि एका दासीच्या ठिकाणी पुत्र उत्पन्न केले. म्हणजे भीष्माचे वय धृतराष्ट्राच्या जन्माच्या वेळेस पस्तीस, पांडूच्या वेळेस ३६ होते. पांडूचा राज्याभिषेक आणि विवाह हे दोन्ही १६ व्या वर्षी धरले तर भीष्म तेव्हा ५२ वर्षांचा होता. त्यानंतर पांडू हिमालयात गेला व त्यास युधिष्ठिर झाला. तो लगेच एका वर्षात झाला असे धरले तर भीष्म ५३ वर्षांचा होता. भीम आणि अर्जुन हे युधिष्ठिरानंतर एकेका वर्षांच्या अंतराने झाले असे गृहीत धरले तर अर्जुनाच्या जन्माच्या वेळेस भीष्म ५५ वर्षांचा होता. अर्जुनाचे वयही विवाहाच्या वेळेस १६ वर्षांचे होते असे धरले तर भीष्म तेव्हा ७१ वर्षांचा होता. त्यानंतर अर्जुन पहिल्या वनवासाला गेला तो बारा वर्षांचा धरला तर भीष्म होतो ८३ वर्षांचा. अर्जुनाने या वनवासकालातच सुभद्रेशी विवाह केला आणि तिला एक वर्षात अभिमन्यू झाला. युधिष्ठिराला दुर्योधनाने द्युतास बोलावले तेव्हा अभिमन्यू

तीन वर्षांचा होता. त्यात पांडव हरले म्हणून त्यांना १२ वर्षांचा वनवास आणि एक वर्षांचा अज्ञातवास करावा लागला. म्हणजे भीष्माचे वय होते १०० वर्षांचे. वनवासानंतर साधारण एक वर्षाच्या आत युद्ध सुरू झाले असे धरले तर भीष्म १०१ वर्षांचा ठरतो म्हणजे भीष्माचे वय युद्धाच्या वेळी १०१ वर्षांचे कमीत कमी असलेच पाहिजे. यापेक्षा कमी वय धरता येणे शक्य नाही. दुसरी गोष्ट अशी की या संपूर्ण वयमोजणीत सर्वांचा विवाहकाल १६ वर्षांचाच धरला पाहिजे तर तो १६ वर्षे असणे शक्य नाही. प्रत्येक राजा सोळाव्या वर्षीच लग्न करणे शक्य नाही. शिवाय त्या काळी स्वयंवर पद्धतीने विवाह होत असत. म्हणजे स्त्रिया पूर्णपणे प्रौढ झाल्याशिवाय त्यांचे विवाह होणे शक्य नाही. दुसरा भाग असा की प्रत्येक राणीला विवाहापासून एका वर्षाच्या आत गर्भधारणा होईलच असे नाही अशा तऱ्हेने वयाच्या एकंदर मोजणीत बरीच तफावत आढळते आणि भीष्माचे वय १०१ वर्षांपेक्षा जास्त होते.

अशाच तऱ्हेचे दुसरे उदाहरण म्हणजे व्यासांचे. व्यास हा सत्यवतीचा मुलगा. त्याने आपल्या भावजयींच्या ठिकाणी पुत्रोत्पत्ती केली. तो महायुद्धानंतरही जिवंत होता. त्याने वैशांपायन ऋषींना महाभारत सांगितले. म्हणजे व्यासाने कौरव-पांडवांच्या पाच पिढ्या पाहिल्या. म्हणजे व्यास ही सरासरी १०० ते १५० वर्षांची व्यक्ती असावी.

तिसरी व्यक्ती म्हणजे परशुराम. रामायणात परशुरामाची एक कथा दिलेली आहे. ज्यात परशुराम आणि श्रीराम यांच्या भेटीचा प्रसंग दिलेला आहे. परंतु महाभारतातही परशुरामाचा उल्लेख येतो. कर्णाने धनुर्विद्येचे शिक्षण परशुरामाकडून घेतले. द्रोणाचार्य आणि पांडव देखील परशुरामाला महेन्द्र पर्वतावर भेटले होते आणि यापूर्वीच काही वर्षे त्याने क्षत्रियांचा संहार केला होता म्हणजे परशुराम पांडवांचा समकालीन होता. परंतु रामायण आणि महाभारत या दोन्ही घटनांत जवळजवळ ३० पिढ्यांचे म्हणजे ६०० वर्षांचे अंतर होते. परशुरामापूर्वीच श्रीराम होऊन गेला होता. त्यांची भेट होणे शक्य आहे का? महाभारत काळात आपली संपूर्ण हयात घालवलेला परशुराम श्रीरामाला भेटला होता हे खरे मानले तर परशुरामाचे आयुष्य ६०० वर्षांपेक्षाही जास्त होते. प्राचीन काळाचे लोक हजारो वर्षे जगत असत असे पुराणात सांगितले जाते आणि महाभारतातही तसे उल्लेख आहेत. पण ती केवळ अतिशयोक्ती असावी कारण प्राचीन काळीदेखील लोकाचे सरासरी आयुष्य १५० वर्षांपेक्षा जास्त नव्हते.

अगदी अलीकडील उदाहरणच जर घ्यावयाचे झाले तर ज्ञानेश्वरांच्या काळातले चांगदेव. चांगदेव १४०० वर्षे जगले. परंतु चांगदेव आपल्या योगविद्येने स्वत:चा मृत्यूकाळ जाणून घेत असे आणि त्यावेळी स्वत:चा आत्मा ब्रह्मांडी नेऊन ठेवीत असे. अशा तऱ्हेने ते १४०० वर्षे जगले. परशुरामही अशाच तऱ्हेने जगले असण्याची शक्यता आहे. परंतु हे जगणे ही आयुर्मयादा होऊ शकत नाही. कारण सामान्य मनुष्यांना योगविद्या अवगत असणे शक्य नाही. फक्त काही मोजकीच माणसे अशा तऱ्हेने जगू शकतात. म्हणून महाभारत काळातील सरासरी आयुर्मयादा १०० ते १५० वर्षांची धरावी लागते. आताच्या काळात मात्र सरासरी आयुर्मान ६० ते ७० वर्षांचे आहे म्हणजे महाभारत काळातील सरासरी वयोमान आताच्या पेक्षा खूपच जास्त होते. इथे आपणाला युग-कल्पनेचा थोडा आधार घ्यावा लागतो. कृत, त्रेता, द्वापार आणि कली ही चार युगे होत. यापैकी कलीयुग आता चालू आहे. पुराणात वर्णन केले आहे की कलीयुग अतिशय वाईट आहे. कलीयुगातील लोकांचे आयुष्य कमी असेल. प्रत्येक युगात लोक सत्याच्या मार्गापासून हळूहळू वंचित होऊ लागतील.

**थोडेसे विषयांतर म्हणजे**
**माणूस अमर होऊ शकतो का?**

अश्वत्थामा, बली, व्यास, हनुमान, बिभिषण,

कृपाचार्य आणि परशुराम हे सात पुरुष चिरंजीव आहेत आणि जगाच्या पाठीवर कोठेतरी अस्तित्वात आहेत अशी समजूत आहे. जगातील कुठलाही प्राणी अमर असू शकत नाही. इतर सर्व मनुष्य प्राण्याप्रमाणेच हे सात पुरुषही मरण पावले. परंतु हे सातजण केव्हा, कोठे व कसे मरण पावले हे कोणालाच समजले नाही. म्हणजेच हे सातही जण बेपत्ता झाले आणि अज्ञात काळातच त्यांचा मृत्यु झाला परंतु अशावेळी बेपत्ता झालेल्या माणसाच्या मृत्यूची किंवा मृतदेहाची जोपर्यंत निश्चित माहिती मिळत नाही तोपर्यंत त्या व्यक्तीला जिवंत मानणे सोयीचे असते. मग लोकांनी या व्यक्तींची निश्चित माहिती मिळत नाही असे पाहून त्या व्यक्तींना अमर ठरविले. श्रद्धेमुळे या व्यक्तींभोवती दिव्यत्वाचे वलय निर्माण झाल्यामुळे या व्यक्ती चिरंजीव आहेत असे मानले जाऊ लागले.

महाभारतातील बऱ्याच व्यक्तींपैकी अभिमन्यू हा १६व्या वर्षी युद्धात मरण पावला असे म्हटले जाते. परंतु त्याच्या वयासंबंधीदेखील शंका आहे. पहिला मुद्दा म्हणजे अर्जुन शस्त्रास्त्रांच्या शोधासाठी गेला होता. त्याचा वनवास संपता संपता त्याने सुभद्रेचे अपहरण करून तिच्याशी विवाह केला. त्यानंतर पांडव १३ वर्षांच्या वनवासाला निघून गेले म्हणजे अभिमन्यूचे वय साधारण १४ वर्षाचे असावे. वनवासाहून परत आल्यावर साधारण महिनाभराच्या अंतराने युद्ध सुरू झाले असे धरले तर युद्धाच्या वेळी अभिमन्यू १४ ते १५ वर्षाचा होता. त्याकाळी कमीत कमी १६ व्या वर्षापर्यंतचा वेळ धनुर्विद्या शिकण्यासाठी लागत असे आणि त्यानंतरच त्याला युवराज म्हणून जाहीर करण्यात येत असे. आता १४ वर्षाच्या अभिमन्यूला युवराज म्हणून घोषित करणे शक्य नाही. अर्जुनाचा पहिला वनवास १ वर्षाचा धरला तर अभिमन्यू १४ वर्षाचा ठरतो. जर हा वनवास १२ वर्षांचा धरला तर अभिमन्यूचे वय १६ वर्षांपेक्षा जास्त होते.

अशा तऱ्हेने महाभारतातील बहुतेक व्यक्तींच्या वयाबाबत निश्चित संख्या उपलब्ध नाही आणि एकंदर घटनाक्रमाने आपण जर वये मोजली तर ती आताच्या सरासरी वयोमानापेक्षा जास्त ठरतात. यावरून आपण एकच निष्कर्ष काढू शकतो तो म्हणजे त्यावेळेची सरासरी आयुमर्यादा आत्तापेक्षा जास्त म्हणजे जवळ जवळ १०० ते १५० वर्षांची असावी.

- माधुरी पाटील, कीर्ती शिंगोटे,
- सुचेता जोशी, प्राची प्रधान,
- स्वाती वैशंपायन, पल्लवी जाधव

(या प्रथम वर्षाच्या १९९२-९३ च्या सुमारास असणाऱ्या विद्यार्थीनी होत्या)

(पान क्र. ५ वरून)

## ठाण्याला वास्तुरूप देणारे शिल्पकार

एकाकी नाहीत. आपल्या ध्येयाशी प्रामाणिक रहाणं - त्यासाठी प्रयत्नांची शिकस्त करणं - आणि जे मिळालं नाही त्याची खंत न बाळगणं या त्रिसूत्रीवरच त्यांचं आजवरचं आयुष्य सुखासमाधानात व्यतीत केलय.

ठाण्याच्या कौपिनेश्वर मंदिर संकुलाच्या नव्या वास्तू रचनेचा आराखडा त्यांनी आणि पट्टेकरांनी अलिकडेच तयार केलाय तो प्रत्यक्षात यावा तसंच सध्याचं ठाणे महाविद्यालय संकुल पूर्ण विकसित होऊन केवळ विद्यालयांचा समूह न रहाता त्याला मूळ आराखड्यानुसार स्वायत्त विद्यापीठाचं स्वरूप प्राप्त व्हावं अशी त्यांची इच्छा आहे. विद्या प्रसारक मंडळातर्फे त्यांचा सत्कार होत असताना त्यांची ही इच्छा लवकरात लवकर फलद्रुप करण्यासाठी सर्वांनी निग्रह करणं आज आवश्यक आहे.

**- नरेंद्र बेडेकर**

# घारापुरी

*भारतातील प्रसिद्ध अशा कलाकृतींचा परिचय सदर लेखमालेतून करून देत आहोत. - संपादक*

(लेख क्र. ३)

मुंबईपासून १० ते ११ कि.मी. अंतरावर समुद्रात एका लहानशा बेटावर हे गाव आहे. याचे प्राचीन नाव श्रीपुरी होते. ही कोकणातल्या मौर्यवंशाची राजधानी असावी. त्यानंतर चालुक्य राष्ट्रकुट यादव मुसलमान यांनी तेथे क्रमाने सत्ता गाजवली.

पश्चिम महाराष्ट्रातील वास्तुशिल्पाचा उत्कृष्ट नमुना म्हणजे घारापुरीची लेणी होत. शैव संप्रदायाच्या अनुयायांनी येथे उभी केलेली गुहामंदिरे ही भारताची गौरवशाली शिल्पसंपत्ती आहे. घारापुरीचे गुहामंदिर म्हणजे स्तंभयुक्त दालन आहे. त्याची एक बाजू २७ मी. असून त्यात सहा सहा खांबांच्या सहा रांगा आहेत. हे सारे स्तंभ एकसारखे व नियमित नाहीत. ही अनियमितता दगड कोरताना आलेल्या अडचणींतून निर्माण झालेली आहे. हे सर्व स्तंभ द्रवीड शैलीचे असून वेरूळप्रमाणेच त्यांना उंच पाया व दंडाच्या वर अनेक कडी असलेला गोलकंठ व त्यावर गोल उशीसारखे स्तंभशीर्ष असलेली घडण आहे. स्तंभशीर्षाच्या वर चौकोनी शिळा (ॲबॅकस) व बेळके हे बांधीव रचनेतील भाग कोरलेले आहेत. दालनाच्या अंतर्गत भागात प्रचंड आकाराची प्रेक्षणीय व प्रभावी उत्थित शिल्पे कोरली आहेत. बहुतेक सर्व शिल्पे शिवाच्या जीवनाशी निगडीत असून ती तत्कालीन शैवपंथीय पुनरुज्जीवनाची साक्ष देतात. प्रत्येक शिल्पाच्या मागे काहीतरी पौराणिक कथा गुंफलेली असून शिल्पकाराने तिचे वास्तवरूप चित्रित करण्याचा प्रयत्न केला आहे.

येथील मुख्य शिल्प त्रिमूर्तीचे आहे. ते मुख्य प्रवेशद्वारासमोर नाही तर स्वतंत्र गर्भगृहात आहे. ६ चौ.मी. च्या गाभाऱ्यात सुमारे पाऊण मीटर उंचीच्या आसनावर त्रिमूर्तीची प्रतिमा आहे. यात फक्त शिवाच्या छातीपासून वरचा भाग दाखवला आहे. मूर्तीचे खोदकाम उत्थित पद्धतीचे असून प्रतिमेभोवती प्रदक्षिणापथ नाही. शिरस्त्राणासह त्रिमूर्तीची उंची ५.२३ मी. असून त्यात उत्पत्ति. स्थिती, लय ही शिवाची तीनही कार्य दाखवली आहेत. मधले मुख देवाधिदेव शंकराचे असून डावीकडील अघोर भैरवाचे आहे. उजवीकडील मुख वामदेवाचे आहे.



निर्माणकर्ता वामदेव, पालनकर्ता महेश आणि संहारकर्ता अघोरभैरव अशी ही मुखे असून त्यांच्या कार्याला अनुरुप असे भाव त्या मुखांवर दाखवले आहेत. वेरुळच्या शिल्पाप्रमाणेच हे शिल्प पेटीसारख्या खोल कोनाड्यात घडवले असल्याने अमर्याद, अथांग, अंधकारमय अवकाशातून ती अवतीर्ण झाल्यासारखी भासतात. मधल्या मुखावरील निर्विकार व गंभीर शांत भाव, अघोर भैरवाच्या मुद्रेवरील क्रौर्य व संताप आणि तिसऱ्या वामदेवाच्या मुखावरील सुंदरता प्रसन्नता लक्षणीय आहे.

त्रिमूर्तीच्या शेजारी पूर्वेस अर्धनारीश्वराची मूर्ती आहे. अर्धनारीश्वर म्हणजे शिव-पुरुष आणि उमा-प्रकृती यांचा समन्वय. उजवे अंग शिवाचे व डावे उमेचे. या मूर्तीची



आच्छादन असून त्याच्या शिखरावरून त्रिमुख स्त्रीची अर्धमूर्ती दाखवली आहे. ही मुखे गंगा, यमुना, सरस्वती या तीन पवित्र नद्यांची असावीत. शंकर या भाराने किंचित कलला आहे. पार्वतीच्या कुरळ्या



केसांवर मुकुट आहे ती वस्त्रालंकारांनी नटली आहे. तिच्या शेजारी प्रसाधन साहित्याची पेटी घेऊन एक दासी उभी आहे. पार्वतीची मूर्ती त्रिभंगात असून फक्त खांद्याकडील भाग शंकराकडे कलला आहे.

उंची ५.१० मी. असून शंकराचा जटाभार व पार्वतीचा केशसंभार यांना जरतारी वस्त्रात आच्छादून त्यावर जडावाचा उंच मुकुट चढविलेला आहे असे भासते. मुकुटाच्या घडणीतून बाहेर आलेल्या उजवीकडील शंकराच्या जटा आणि डावीकडील पार्वतीच्या कुरळ्या बटा दिसतात. शंकराच्या जटांमध्ये चंद्रकला असून कानाची पाळी लांब व त्यामध्ये एकच बाळी आहे. पार्वतीच्या कानात कर्णफुले दिसतात. शंकराचा एक हात नंदीला आवरत आहे तर पार्वतीच्या हातात वर्तुळाकार दर्पण आहे. मूर्ती एक असूनही दोन्ही बाजूंनी भिन्न भाव दिसतात. तसेच साजेशी शारीरिक ठेवणही आहे. अर्धनारीश्वराच्या मागे आणि आजूबाजूला अनेक मूर्ती आहेत. त्यापैकी गरुडाच्या खांद्यावर बसलेला चतुर्हस्त विष्णू, दोन दासी, मकरवाहन वरुण, ब्रह्मदेव, इंद्र वगैरेंच्या मूर्ती कलात्मक आहेत.

त्रिमूर्तीच्या पश्चिमेला गंगाधराची मूर्ती आहे. ही मूर्ती ३.७५ × ५.५० मीटरच्या चौकटीत खोदलेली आहे. त्यातील शिवाची उंची ५ मी. असून पार्वतीची उंची ३.७५ मी. आहे. शंकराच्या जटाभारावर त्रिधारी मुकुटाचे

शिवपार्वती विवाह या मूर्तीत पार्वतीची मूर्ती अत्यंत प्रमाणबद्ध व बांधेसूद असून शिवपार्वती या दोन्ही मूर्तींची बरीच मोडतोड झाली आहे. पार्वती शंकराच्या उजव्या बाजूस असून तिचा उजवा हात शंकराच्या डाव्या हातात होता असे मूर्तीच्या ठेवणीवरून वाटते. देखणा दयाळू शिव प्रसन्न दिसत आहे. पार्वतीचे कन्यादान तिचा पिता करीत आहे. तिला शिवाच्या हाती देत आहे. या मंगलप्रसंगी ब्रह्मा



पुरोहित असून तो शिवाच्या डावीकडे बसला आहे. मेघमंडळातून हा मंगल प्रसंग देव पहात आहेत असे दृश्य दाखवले आहे.

येथील अंधकासुरवध मूर्तीचा खालचा भाग फुटून गेला असला तरी एकूण सारा प्रसंग स्पष्ट दिसतो. विक्राळ शिव खडकांमधून पुढे घुसून अंधकासुराला ठार करत आहे. त्याच्या शरीरातून पडणारे रक्ताचे थेंब पकडण्यासाठी त्याने एका हातात पात्र धरले आहे. उजव्या हाताने शिवाने हत्तीचे कातडे धरले आहे. अंधकाचा मित्र नीळ याने गजरुप धारण करून शिवावर हल्ला चढवला होता. पण शिवाच्या एका सेवकाने त्यास ठार केले. एकूण या चित्रातून उग्र शिवाचे यथार्थ दर्शन होते.

या शिल्पाकृतीव्यतिरिक्त चतुर्भुज द्वारपाल, गणेशमूर्ती कार्तिकेय, ब्रह्मा, विष्णू वगैरेंच्या मूर्तीही नजरेत भरण्यासारख्या आहेत. घारापुरीतील काही शिल्पकृती सध्या मुंबईच्या प्रिन्स ऑफ वेल्स वस्तुसंग्रहालयात ठेवलेल्या आहेत. त्यापैकी चतुर्मुख ब्रह्माची मूर्ती शांत मुद्रा व प्रमाणबद्धता या दृष्टीने उल्लेखनीय आहे.

वेरुळप्रमाणेच येथील प्रचंड उत्थित शिल्पे उंच उठावाची असल्याने छाया-प्रकाशाचा एक अद्‌भुत खेळ येथे निर्माण झाला आहे. त्यामुळेच या शिल्पांमध्ये नाट्यपूर्णता आली आहे. घारापुरीचे शिल्पवैभव पाहून पाश्चात्त्य पुरातत्त्ववेत्तेही मान्य करतात की,

No doubt the cave was the creation of an unknown genius, a master architect, who having thoroughly observed and assimilated the magnificient contribution of his predecessors in the duel traditions of the casing of independent free standing sculpture and rock-cut architecture, produced a monument, which introduced a whole new world of form quite distinct from any previous achievements.

असे महान शिल्पवैभव जपणे हे आपले धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक कर्तव्य आहे.

संकलन - **सौ. मंजिरी दांडेकर**
कलाशिक्षिका
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
(मा.वि.ठाणे)

**संदर्भ**


- A History of Fine Arts in India & the west - Edith & Tomary
- घारापुरीची अक्षरशिल्पे - भूमकर वि.ह.
- संस्कृतिकोश
- विश्वकोश - जोशी लक्ष्मण शास्त्री (सं.)
- भारतीय कलेचा इतिहास


दिशा नियमित वाचा

*आपलीमते जाणून घेण्यास उत्सुक आहोत.*
*- संपादक*

# ‘लगोरी’ - एक वाचनीय काव्यसंग्रह

*लगोरी या काव्य संग्रहाचा एक परिचय - संपादक*

दरवर्षी मराठीत अनेक काव्यसंग्रहांची भर पडत असते. पण त्यातले मोजकेच काव्यसंग्रह रसिकांच्या पसंतीस उतरतात; त्यांच्या मनावर छाप टाकतात. असाच एक लक्षवेधी काव्यसंग्रह २० सप्टेंबर २००३ राजी संवेदना प्रकाशनातर्फे कवी श्री. राज वसंत शिंगे यांचा प्रसिद्ध झाला. त्यांच्या ‘लगोरी’ या दुसऱ्या काव्यसंग्रहातून समाजातील असुरक्षिततेचे, गोठलेल्या भावनांचे ते अचूक चित्रण करतात. या काव्यसंग्रहाचा परिचयात्मक दृष्टीने घेतलेला हा गोषवारा -

‘ती आणि मी’ या कवितेतून (पृ. क्र. १०) सर्वसामान्य माणसांच्या सुखं-दु:खांचे, तडजोड करून जगण्याचे वर्णन केलेले आहे. तसेच जगण्यातला यांत्रिकपणा,घड्याळाच्या काट्यावर अवलंबून काटेरी जीवन यातले सूक्ष्म भाव टिपलेले आहेत.

मग ती आणि मी
सकाळी सकाळी
एका मागोमाग
चावी दिल्यागत दोघंही...
सैरभैर सावरतो सर्व...

‘पुरुषासाठी’ या कवितेतून (पृ.क्र.१२) पुरूषाचा पुरुषार्थ हा फक्त मादीसमोर असल्यावरच दिसतो, असा आशय व्यक्त केलेला आहे. स्त्रीपुरुषाला जन्म देते, पण तिच्यावर अत्याचार होताना मात्र पुरूष पाहत राहतो. जो पुरुष एखाद्या स्त्रीवर अत्याचार करतो त्याला रोखण्याचे सामर्थ्य दुसऱ्या पुरुषामध्ये नाही; कारण त्यालाच त्याच्या पुरुषार्थाला तडा जाण्याची भिती वाटते असा वास्तववाद सांगताना कवी पुढे म्हणतो की जी आई पुरूषाला जन्म देते तिचेही नाव तो कधी लावत नाही. कवीचा शब्दांतला सकसपणा पुढील ओळींतून दिसून येतो.

वांझ मनाचा पुरुषार्थ तुझा
अधिक नागवा झाला
जेव्हा तिला
भर वर्गात... जाळलं
हे पुरूषी झेंडे
कितीही फडकले तरी..

आजही योनीसुखासाठीच एक उपभोग्य वस्तू म्हणून स्त्रीकडे पुरूष पाहत असतो असा आशय ‘विस्कटलेली’ या कवितेतून (पृ. क्र. २४) व्यक्त करताना कवी बलात्काराच्या प्रसंगाचे चित्रण करतो. सामुहिक पुरूषार्थ गाजवून गेल्यावर जन्माला येणाऱ्या कोवळ्या जीवाच्या अस्तित्वाचा प्रश्न देखील कवितेतून मांडला आहे.

शरीरसुख.. योनीसुखासाठी
उकिरडे फुंकणारे... नर
सामूहिक पुरूषार्थ
गाजवून गेले...
अंधाराचा फायदा घेऊन
तिच्या वेड्या गर्भात
रक्त.... मांसपेशींना
रुजवून गेले...

याच्याच पुढचा आशय कवी ‘उंबरठा’ या कवितेतून (पृ. क्र. ४४) व्यक्त करताना समाजातील वखवखलेल्या वासनांचे, भोगवादीपणांचे चित्रण करतो.

स्वामींचा गजर करीत
टाळमृदंगाच्या ठेक्यावर
डोलणारे ढोंगी भक्त....

माझ्यासमोर
पूर्ण नागवे असतात
पडद्याआड
माझ्या गाभाऱ्यात

'मुखी विठ्ठलाचे नाव, पण मनी वासनेचे भाव' असा गंभीर पण तितकाच वास्तववादी विचार कवी परखडपणे मांडतो. 'उंबरठा' ही कविता 'विस्कटलेली' या कवितेची पुढची पायरी आहे असे म्हणायला काहीच हरकत नाही; कारण यातून व्यक्त केले जाणारे अनुभवविश्व, विचार एककेंद्री आहेत. परंतु दोन्ही कवितेतील विचारांचा गाभा जरी समान असला तरी मांडणी मात्र वेगळ्या पद्धतीची आहे. त्यामुळे या दोन्ही कविता विशेष वाटतात.

'एक होता' या कवितेतून (पृ. क्र.१७) मात्र निघून कवीच्या वेगळ्या विचार शैलीचा प्रत्यय येतो. अचानक आपल्यातून निघून गेलेली व्यक्ती, त्यांचे दु:ख यातून व्यक्त केलेले आहे. देहरूपी व्यक्ती आपल्यातून निघून जाऊ शकते, पण त्याच्या आठवणी, ओढ मात्र संपत नाही असा विचार अगदी मोजक्या शब्दांतून कवी पुढील ओळींतून सांगतो.

हाडं-मांस आकारातून
तू नाहीसा झालास... खरा
पण उरला मनात
कायमचा...

स्वत:चं छानसं घर असण्याचे प्रत्येकाचे स्वप्न व त्यासाठी वाढत जाणारे काँक्रिटचे जंगल व परिणामाने कमी होत जाणारा निसर्ग याचे उत्कृष्ट चित्रण कवीने 'घर' या कवितेतून (पृ. क्र. १९) केलेले आहे.

घर घ्यायचं
गोंडस, गुटगुटीत स्वप्न
उराशी बाळगत
रेती, विटा, दगड, खडीपार करीत
सिमेंटचं घर शोधतायत सर्व...
वर निळं आभाळ काबीज करीत....
खाली गर्द हिरवं रान गिळत..
माणसामाणसांसाठी
विटांची जिवंत थडगी रचित
काँक्रीटचं जंगल वाढतंय अजूनही...

सुरक्षिततेच्या गोंडस आवरणाखाली कशाप्रकारे मुलींना दाबलं जातंय, त्यांना त्यांच्या हक्कांपासून कसे वंचित ठेवण्यात येते असे चित्रण 'कवच' या कवितेतून केलेले आहे. बालपणापासून तरुणपणात येईपर्यंत मुलींमध्ये होत जाणारे शारिरीक, भावनिक बदल पुढील ओळींतून अचूक टिपलेले आहे. (पृ. क्र. २२)

बहरत... उमलणारं
तुझं तरुणपण
कपड्यातून उसवत
डोकावू लागलं...
तेव्हा तुझ्या मोहक हालचाली
टिपणाऱ्या असंख्य नजरा
भाल्यागत बोचताना...
सावध झालीस तू

समाजाचा मुलींबद्दल असलेल्या संकुचित वृत्तीबरोबच कवितेत रिंकू पाटील, अमृता देशपांडे यांची उदाहरणे देखील येतात. कवी पुढे म्हणतो की मुलींवर होणारे अत्याचार हे असेच सुरू राहणार त्यामुळे मुलींनी कणखर बनायची गरज आहे. वर्षानुवर्षे आखून दिलेल्या या अभेद्य कवचाबाहेर येण्याचा प्रयत्न त्यांनी केला पाहिजे.

'राम आणि रहीम' या कवितेतून (पृ. क्र. २९) सत्तेसाठी धर्माची सुरू असलेली सौदेबाजी निर्भिडपणे मांडली आहे.

तिथं रामही नव्हता
आणि रहीमही...

फक्त धर्मरंगाचा
सौदा झाला होता...

अशा विविध आशयांनी नटलेल्या ५० कवितांचा संग्रह म्हणजे 'लगोरी'. साचेबंद जीवनाची कहाणी व्यथित करून साकळलेल्या भावना, प्रत्येकाचं आपल्यापुरतंच जगणं, ढोंगी, वांझ पुरूषार्थ, समाजातील बकालपणा व संकुचित वृत्ती, अत्याचार, पळकुटेपणा अशा विविध छटा या काव्यसंग्रहात दिसतात. या कवितांतील वास्तववाद मनाला सुन्न करून सोडतो. या काव्यसंग्रहाचे वैशिष्ट्य म्हणजे यात केलेला स्त्रीचा सखोल विचार होय. कवी पेशाने चित्रकार असल्यामुळे कवितेतील कलात्मक दृष्टिकोन, त्याची नाट्यमयता योग्य साधली जाते. फरक इतकाच आहे की इथे कवींच्या हातात कुंचल्याच्या व रंगाच्या माध्यमाऐवजी शब्दांचे माध्यम आहे. त्यामुळे दुहेरी व्यक्तिमत्व जपताना कवीने शब्दांचे माध्यमही योग्य तऱ्हेने पेलले आहे असा प्रत्यय काव्यसंग्रह वाचताना नक्कीच येतो आणि आपल्याला भेटते ते त्यांचे परिपक्व भावविश्व.

**लगोरी**
राज वसंत शिंगे
संवेदना प्रकाशन, पुणे
पृ. ६०
मूल्य रु. ६०/-

**गीतेश गजानन शिंदे**
२०३, स्वप्नजा सोसायटी,
धोबी आळी, मावळी मंडळ हॉल जवळ,
टेंभी नाका, ठाणे (प.) - ४०० ६०१.
दूरध्वनी : २५३७ ९५१९

*(पान क्र. १५ वरून)*

## डॉ. मो. दि. पराडकर यांचे आत्मकथन

फार मोकळा आणि माझ्याबद्दल आस्था असलेला माणूस. त्यांचं T.D. Department होतं. आमचे R.W. Joshi त्यांचे हेड होते. तर त्यांनी कॉमनरुममधेही सरळ सांगितलं की ही पराडकरांची कृपा आहे. त्यांनी आपला बळी दिला पण त्यामुळे आम्हाला मात्र पाहिजे होतं ते सगळं मिळून गेलं !

अर्थात हा प्रत्येकाचा योग असतो असं मी समजतो. माझं रुईया कॉलेज सोडणं हाच योग असेल तर त्याला खुद्द रुईया कॉलेज तरी काय करणार ?

आज ज्यांचं वय ९७ आहे. त्या सोमैय्यांनी सांगितल होतं की प्रिन्सिपॉल ज्यांच्या विषयी आग्रही आहेत त्या पराडकरांचा त्यांनी कितीही पैसे मागितले तरी ते देऊन आपल्याकडे घ्या. ते आपल्या संस्कृत विभागाचे अध्यक्ष असणं आपल्याला भूषणावह आहे !

तेव्हा त्या कॉलेजचे हेड ऑफ द डिपार्टमेंट (विभाग प्रमुख) म्हणून आमची नावं टाईम्समधे छापून आली. संस्कृतच्या माणसाला एवढी प्रसिद्धी एरवी कुठून मिळायला! पण त्या कॉलेजला, त्या माणसांना विशेषतः करमसी सेठ सोमैय्या (आज दुर्दैवाने आता ते हयात नाहीत) संस्कृतबद्दल विशेष आकर्षण होतं, त्यामुळे ते झालं. प्राधान्याने ते गुजराथी विद्यार्थ्यांचे कॉलेज. माझी प्रतिष्ठा रुईया महाविद्यालयाच्या गुजराथी भाषी विद्यार्थ्यांनीच मोठ्या प्रेमाने सांभाळली नव्हे, वाढवली होती त्याचा फायदा मला इथेही झाला.

**- मो.दि. पराडकर**

# अविचल

*कोणतेही काम करताना चित्र विचलित होऊन चालत नाही याबद्दल - संपादक*

आपण आपल्या प्रत्येक कामात अविचल रहायला शिकले पाहिजे. अविचल म्हणजे आपल्या प्रत्येक कामात आपण चलविचल होता कामा नये. आपल्याला एखादे काम जड जात असेल किंवा ताण सहन होत नसेल तर आपल्या मनात त्या कामाबाबतीत आपण चलबिचल होण्याची शक्यता अधिक. कामाचा ताण सहन करण्यापेक्षा तो हलका होण्याकरता कुठला तरी विरंगुळा मनाला लावून घेणे आवश्यक आहे. कितीही त्रास झाला व चलबिचल जरी झालो तरी कुठलेही काम आपल्याला अर्ध्यावर सोडून देणे इष्ट नाही. चलबिचल होण्यासाठी जनातल्या, मनातल्या पुष्कळ गोष्टी कारणीभूत असतात की ते नित्य आपल्या कामात काही ना काहीतरी अडथळे निर्माण करतात व ही अडथळ्याची शर्यत आपल्याला पार करणे अवघड होऊन बसते. याकरता प्रथम आपण शुल्लक गोष्टींचा अथवा बाबींचा विचार करू. शुल्लक बाबतीत देखील आपण नीटनेटकेपणा दाखवायची आवश्यकता आहे व तशी सवय आपण आपल्याला लावून घेणे इष्ट आहे. शुल्लक बाबतीत देखील आपण जाणीवपूर्वक किंवा नेणीवतेने काम केले तर आपल्याला शुल्लक बाबतीत देखील यश दूर नाही. जेव्हा आपण एखादे काम करत असू तेव्हा येणाऱ्या प्रत्येक अडथळ्याचा स्वतंत्र विचार करून त्यावर उपाय शोधण्याचा आपण प्रयत्न करणे आवश्यक आहे. फक्त वरवर विचार करून चालण्यासारखे नाही तर त्यात खोलात उतरणे आवश्यक आहे व जे अडथळे अधिक त्रासदायक नसतील त्याकडे पूर्णपणे कानाडोळा करणे अथवा दुर्लक्ष करणे आवश्यक आहे. त्यात काय एवढे म्हणून त्याबाबतीत अधिक विचार न करणे हेही उत्तम जेव्हा आपण अभ्यास करत असू अथवा काही वाचत असू उदा. पेपर, मासिक इत्यादी तेव्हा समजा आपल्या जवळील किंवा शेजारून टिव्ही. रेडिओचा आवाज आपल्याला त्रासदायक ठरत असेल तर त्यावर शांत मार्गाने उपाय शोधावा. फार तर आपली दारे खिडक्या बंद करून घ्यावीत अन्यथा शेजार चांगला असेल तरच त्यांना थोडा आवाज हळू करण्यास सांगावे. अशा विविध मार्गाने आपण आपली समस्या सोडवावी. पण यात कुठेही आपण भांडण करू नये अथवा अधिक त्रास आपण आपल्याला करून घेऊ नये. या बाबतीत आपण दक्ष रहाणे आवश्यक आहे. अशा अनेक अनंत अडचणी या आपल्या नित्य जीवनात येतच असतात. यातून आपण मार्ग काढायला शिकलो तर आपल्यासारखे आपणच.

आपण आपल्या कामाच्या बाबतीत अविचल रहाण्याकरता काही सवयी अशा की थोडावेळ आवड असेल तर नित्य नामजप करणे. पंधरा मिनिटे ध्यान करणे. रात्री झोपताना शवासन करणे. सकारात्मक विचारांच्या सुचना कागदावर लिहून सकाळी उठल्यावर कागदावर लिहून सकाळी उठल्यावर व रात्री झोपण्याच्या अगोदर त्या सूचना ग्रहण करायची सवय लावून घेणे. वेळेवर लहानसहान कामे करण्याची सवय लावून घेणे म्हणजे वेळेवर जेवणे, ठराविक वेळीच चहा पिणे, आठवड्यातून एक दिवस उपास करण्याची सवय अंगीकृत करणे व आपल्या कल्पनेने कित्येक चांगल्या बाबी आपण आपल्या सवयी करता घेऊ शकतो व अशा सवयीतून आपणाला आपल्या कामाच्या बाबतीतील चलबिचलपणा कमी होत होत नाहीसा होईल व आपण आपल्या कामाच्या बाबतीत दीर्घकाळ अविचल रहायला शिकू व त्यातच आपले भले आहे.

**प्रसन्न गोविंद कुलकर्णी**
५ हेमकुंज, झवेर मार्ग,मुलुंड (प.), मुंबई - ८०.
फोन नं. २५६१ २३८८

# साहित्यजगत

## श्रीरामरक्षेतील व्याकरण

(स्तोत्र, अन्वय, भाषांतर, रूपे, संधी, समास, प्रयोग इ. सहित)

श्री. दिनकर दामोदर औटी (शिवकृपा, घर नं. ७३, विठ्ठलमंदिरासमोर, मुद्रे (खुर्द), ता. कर्जत, जि.रायगड - ४१० २०१. दूरध्वनी - ९५२१४८-२११०९) हे संस्कृतचे एक गाढे अभ्यासक आहेत. गेली अनेक वर्षे ते विद्यार्थ्यांना संस्कृत शिकवीत आहेत.

श्रीरामरक्षा स्तोत्र हे अतिशय लोकप्रिय स्तोत्र आहे. बहुतेक सर्व घराघरातून ते म्हटले जाते. त्याची मराठीत अनेक भाषांतरे उपलब्ध आहेत. पण त्यातील व्याकरण समजावून सांगणारे पुस्तक उपलब्ध नाही. ही उणीव दूर करण्यासाठी श्री. दिनकर औटी यांनी प्रस्तुतचे 'श्रीरामरक्षेतील रामायण' हे पुस्तक (पृ. ७८, देणगी मूल्य रु. ५०/-) लिहिले. त्यामध्ये तद्धित रूपे स्पष्ट करून सांगितली आहेत. संधी नियम परिशिष्ट क्र. १ मध्ये दिले असून विसर्ग संधी व व्यंजन संधी यांना क्रमांक दिले आहेत. त्या क्रमांकाचा संधी परिशिष्टांत पाहिला की संधी नियमांचा चांगला सराव होईल.

संधीनंतर रुपे श्लोकांच्या खालीच दिली आहेत. त्यांचा अर्थही तेथे दिलेला आहे. रुपांचा क्रम अन्वयाच्या अनुषंगाने दिला आहे. त्यामुळे स्वतंत्रपणे अर्थ लावायला मदत होईल. यानंतर सर्व समास सोडवून दिले आहेत व त्यांचे अर्थही दिले आहेत. श्रीरामरक्षा हे स्तोत्र समास प्रचुर आहे.

डॉ. विजय बेडेकर ('शिवशक्ती', महर्षी कर्वे रोड, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२.) यांची विवेचक प्रस्तावना या पुस्तकास लाभली आहे. त्यात ते म्हणतात, 'हिंदूंच्या 'राम' या देवतेच्या संदर्भात इतके प्रचंड लिखाण झाले आहे की, त्यांची पूर्ण नोंद घेणेही शक्य नाही. यातील फारच थोडा भाग छापील स्वरूपात उपलब्ध असून काही शेकड्यांनी हस्तलिखिते जुन्या ग्रंथालयांतून पडत आहेत.' त्या प्रस्तावनेत डॉ. बेडेकरांनी काही जुन्या हस्तलिखितांची व स्तोत्रांची व प्रकाशित ग्रंथांची माहिती दिली (त्यात त्यांनी १७ तळटीपांतून काही उल्लेखनीय ग्रंथांची, शोधनिबंधांची, लेखांची माहिती दिली आहे.) याआधी रामरक्षेवर अशाप्रकारे लिखाण झालेले दिसत नाही. लेखकाने पुस्तकाच्या मनोगतात आपली भूमिका विस्तृतपणे मांडली आहे.' असे प्रस्तावनेच्या अखेरीस डॉ. बेडेकरांनी म्हटले आहे. सौ. मालतीबाई नवाथे ट्रस्ट (सद्धर्म प्रकाशन), द्वारा लक्ष्मी केशव कार्यालय, प्रताप सिनेमासमोर, कोलबाड, ठाणे - ४०० ६०१. दूरध्वनी - ९५२२-२५४७१४९८) ने हे पुस्तक प्रसिद्ध केले आहे. लेखक श्री. औटी व प्रकाशकाचे अभिनंदन.

## देहदान : शंका-समाधान

आपल्या पुराणातील दधीचि महर्षींची गोष्ट आपल्या सर्वांना माहीत आहे. त्यांनी देवांच्या विनंतीवरून योगमार्गाने प्राणत्याग करून आपला देह देवांना वज्र बनविण्यासाठी दिला व देवांनी त्या वज्राच्या सहाय्याने वृत्रासुराचा वध केला. जगात पहिले देहदान दधीचि ऋषींचे झाले आणि म्हणून गेली १५ वर्षे सातत्याने मरणोत्तर नेत्रदान/देहदान तसेच अवयवदान यांचा प्रचार-प्रसार करणाऱ्या संस्थेने आपल्या संस्थेचे नाव 'दधीचि देहदान मंडळ' (न्यू आनंद को.आ. हाऊसिंग सोसा. पंडित दीनदयाळ मार्ग, श्रीगणपती मंदिरासमोर, डोंबिवली (प.), जि. ठाणे - ४२१२०२) असे ठेवले आहे.

उपरोक्त सर्व दानांची सविस्तर माहिती देण्याच्या दृष्टीने 'देहदान शंका समाधान' हे अत्यंत उपयोगी पुस्तक (पृ. ९०, मूल्य रु. ३०/- फक्त) संपादक सुरेश तांबे यांनी प्रसिद्ध केले आहे. पुस्तकाची ४थी आवृत्ती नुकतीच प्रकाशित झाली आहे. त्यात 'दृष्टिक्षेपात दधीचि देहदान मंडळ' (सुरेश तांबे), 'मरणोत्तर देहदान-गरज कायदा' (डॉ. म.चिं. आठवले), 'महाराष्ट्रातील नेत्रपेढ्या' (चिंतामणी गद्रे), 'देहदान : शंका समाधान' (बा.वा. भागवत), 'स्वेच्छा मरण' (अच्युत दीक्षित), 'मोठ्या ऑपरेशन्ससाठी देणग्या देणाऱ्या संस्थांची नावे' (डॉ. रविंद्र रामदास) इ. अत्यंत महत्त्वाचे लेख आहेत. सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांनी आणि कार्यकर्त्यांनी हे उपयुक्त पुस्तक आपल्या संग्रही तर ठेवावेच व त्याचा प्रचार-प्रसार करावा आणि 'दधीचि देहदान मंडळ' (डोंबिवली)चे कार्य सर्वदूर पोहोचवावे. या उपयुक्त पुस्तकाच्या हजारो प्रती निघाल्या पाहिजेत. 'दधीचि देहदान मंडळा'चे मन:पूर्वक अभिनंदन.

## तुझी माझी जोडी जुळताना

डोंबिवलीच्या प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या सौ. भारती मोरे (संचालिका, 'सांगाती' - विवाहपूर्व समुपदेशन केंद्र, डोंबिवली (पू.) यांनी एक उत्कृष्ट पुस्तिका (पृ. ३२, देणगी मूल्य रु. २०/- फक्त) प्रकाशित केलेली आहे. आपल्याकडे लग्न जुळविण्याच्या दोन मुख्य पद्धती आहेत. ठरवून केलेला विवाह (ॲरेंज्ड मॅरेज) आणि प्रेमविवाह (लव्ह मॅरेज) पहिल्या पद्धतीत जात, कुंडली, शिक्षण, नोकरी, रंगरुप यावर अधिक भर दिला जातो. लग्नाचा निर्णय घेण्याआधी ज्या अनेक मुद्द्यांचा विचार होणे अत्यावश्यक असते, त्याकडे पूर्णत: दुर्लक्ष केले जाते. या लग्नपद्धतीत मिळत नाही. प्रेमविवाहाच्या बाबतीत तरुण तरुणी बाह्यरुपावर भाळून भावनेच्या भरात लग्नाचा निर्णय घेतात, असे विवाह विशेषत: स्वप्नाळू वयातली 'प्रेमलग्ने' म्हणजे 'अंधारातली उडी' ठरते. एकूण काय तर दोन्ही पद्धतीमध्ये जोडीदाराची निवड चुकण्याची शक्यता अधिक असते.

समाजातले घटस्फोटांचे वाढते प्रमाण, एकपालक कुटुंबांच्या संख्येत होणारी वाढ आणि त्याचा मुलांच्या विकासावर होणारा अनिष्ट परिणाम या सगळ्याचा गंभीरपणाने विचार करण्याची वेळ आली आहे. आनंदी आणि अर्थपूर्ण सहजीवनासाठी जोडीदाराची निवड डोळसपणे आणि विचारपूर्वक करणे आज गरजेचे बनले आहे आणि याच भूमिकेतून 'सांगाती विवाहपूर्व समुपदेशन केंद्र स्थापन झाले आहे. (संस्थेचा पत्ता असा - द्वारा भारती मोरे, अ/१, भालचंद्र कृपा को.ऑप. सोसायटी, मानपाडा रोड, शिरोडकर हॉस्पिटलजवळ, डोंबिवली -पूर्व - ४२१२०१. (दूरध्वनी - ९५२५१ - २४४९३४४) या केंद्राने प्रसिद्ध केलेली प्रस्तुत पुस्तिका म्हणजे 'तुझीमाझी जोडी जुळताना' ही होय. या पुस्तिकेची संकल्पना व संपादन भारती मोरे यांचे आहे. पुस्तिकेत भारती मोरे श्रेष्ठ सामाजिक कार्यकर्ती सुनिती सु. र., डॉ.करुणा गोखले, डॉ. उल्हास कोल्हटकर, ॲड वृन्दा कुलकर्णी, डॉ. वसंत भुमकर यांचे मार्गदर्शनपर लेख आहेत. पुस्तिकेच्या मलपृष्ठावर / (शेवटच्या) गौरी कुलकर्णी (पुणे) यांनी दिलेली आधुनिक कुंडली विशेष महत्त्वाची आहे. मातापित्यांनी आणि लग्नेच्छु तरुण-तरुणींनी ही पुस्तिका वाचलीच पाहिजे.

## वैदिक व्याख्यानमाला

वेदमूर्ती कै. पंडित श्रीपात दामोदर सातवळेकर हे एक अलौकिक व्यक्तिमत्त्व होऊन गेले. आपले शतायुषी जीवन (जन्म - १९-९-१८६७ मृत्यु - १९६८) वेदवाङ्मयाचा अभ्यास व संशोधन यासाठीच त्यांनी व्यतीत केले. औंध संस्थानात असताना त्यांनी इ.स. १९३८ ते १९४५ या दरम्यान होणाऱ्या व्याख्यानात आपल्या वैदिक काळातील विविध संशोधनांवर आधारित व्याख्याने दिली होती.

त्यातील काही व्याख्यानाचे संकलन म्हणजे प्रस्तुतचा ग्रंथ वैदिक व्याख्यानमाला (पृ. डेमी २३४, मूल्य रु. १२५/- फक्त) 'आदर्श पुरुषाचे दर्शन', 'वैदिक अर्थव्यवस्था आणि स्वामीत्वाचा सिद्धांत', 'आपले स्वराज्य', 'व्यक्तिवाद आणि समाजवाद', 'वैदिक काळाची सैन्याची व्यवस्था', 'वैदिक काळची सैन्यरचना व त्याची आक्रमण शक्ति', 'भारतीय संस्कृतीचे स्वरुप', 'वैदिक राज्यशासनात आरोग्यमंत्र्याचे कार्य आणि व्यवहार', 'सप्त व्याहति' असे व्याख्यानांचे विषय आहेत. ग्रंथाचे प्रकाशक आहेत स्वाध्याय मंडळ (पारडी) पुणे शाखा 'सदामंगल', ११७०/ १९, रेव्हेन्यू कॉलनी, शिवाजीनगर, पुणे - ४११००५. (दूरध्वनी - ९५२०-२५५३७४५२). ग्रंथाच्या विक्रीची व्यवस्था खालील ठिकाणी आहे.

+ पुरुषार्थ मासिक प्रकाशन, पत्ता वरीलप्रमाणे

+ भारतीय विचारसाधना (पुणे),
मोतीबाग, शनिवार पेठ,

पुणे - ४११०३० (दूरध्वनी - ९५२०-२४४९०४५४)

**- शरद जोशी**
ग्रंथप्रसारक
सी/५, अमर कल्पतरु सोसा.
देवी चौक, शास्त्रीनगर, डोंबिवली (प.),
जि. ठाणे - ४२१२०२.

# पुस्तक परिचय

## नवनीत

आद्यकर्ते - कै. परशुराम बल्लाळ गोडबोले
संपादक - अनंत काकबा प्रियोळकर
शतसांवत्सरिक (अठरावी) आवृत्ति
डायरेक्टर, मराठी संशोधन मंडळ, मुंबई
मुंबई राज्य शिक्षणखाते, मुंबई - १९५७

नवनीत हा ग्रंथ प्रथम इ. स. १८५४ साली प्रसिद्ध झाला. जुन्या मराठी वाङ्मयाची लोकप्रियता वाढविण्याचे फार मोठे कार्य या पुस्तकाने केले आहे. इ.स. १८१८ साली इंग्रजी सत्तेचा अंमल महाराष्ट्रात सुरू झाला. त्यावेळी एतद्देशीय लोकांना शिक्षण द्यावे, असे इंग्रज राज्यकर्त्यांना वाटू लागले व ३१ ऑगस्ट १८२२ ला गव्हर्नर मोंटस्टुअर्ट एल्फिस्टन यांच्या नेतृत्वाखाली नेटीव्ह स्कूल बुक ॲन्ड स्कूल सोसायटी (हैंदशाळा पुस्तक मंडळी) ही संस्था स्थापन झाली.

परंतु सुरुवातीला मराठीतील संपन्न वाङमयाची या राज्यकर्त्यांना अजिबातच कल्पना नव्हती. आपल्याला शुन्यातून नवीन वाङ्मयसृष्टी उभारायची आहे अशी त्यांची कल्पना होती परंतु याचे मुख्य कारण ज्ञानेश्वरांपासून मोरोपंतांपर्यंत कवींनी ज्या भाषेत ग्रंथरचना केली ती प्राकृत या नावाने, यामुळे मराठी ही प्राकृत भाषेपेक्षा वेगळी असावी अशा चुकीच्या समजुतीमुळे त्यांना मराठी वाङ्मयाची प्रगल्भता लक्षात आली नाही.

पुढे कृष्णशास्त्री चिपळूणकरांनी मेजर कँडीना मराठी कविता वरिष्ठ विद्यार्थ्यांना शिकवण्यात यावी अशी सूचना केली व नवनीत हे महाराष्ट्रातील कवितांच्या वेच्यांचे पुस्तक आकारास आले हे पुस्तक पुणे पाठशाळेकडील छापखान्यात इ.स. १८५४ साली शिळाछापावर मुद्रित

झाले. याचा आकार ८''१ × ५''२ इतका असून पृष्ठसंख्या ८ + ४०० इतकी होती.

या ग्रंथात प्राकृत भाषेतून म्हणजेच मराठी भाषेतून कविता करणारे आद्यकवी मुकुंदराज, ज्ञानेश्वर, एकनाथ, मुक्तेश्वर, वामनपंडित, रामदास, तुकाराम, श्रीधर, मोरोपंत, अमृतराय यांचे काव्यातील थोडे वेचे घेऊन त्या काळातील लोकांना या काव्याचा आस्वाद घेता यावा यासाठी हे पुस्तक संपन्न केले आहे.

ह्या पुस्तकाचा मुळ हेतू तरुण वाचकांनी हे पुस्तक वाचावे, त्यांना ह्याची गोडी लागून त्यांच्या मनाची प्रवृत्ती तशी व्हावी, त्यांना या कवितातील रस, चमत्कृती, त्यांचे प्रकार हे सर्व समजावे व अशी शक्ती त्यांना प्राप्त व्हावी हा आहे व ह्या पुस्तकात सुरुवातीच्या आवृत्तीत जसा कवितांचा संग्रह होत गेला तसा क्रम कवितांना दिला आहे. परंतु या शतसांवत्सरीक आवृत्तीत मात्र कालानुक्रमे कवीच्या कविता दिल्या आहेत.

या ग्रंथाच्या १ ल्या आवृत्तीच्या केवळ पाचशेच प्रती छापण्यात आल्या होत्या. पुढे दोन वर्षात त्याच्या आणखी दोन आवृत्ती काढण्यात आल्या व दिवसेंदिवस याची लोकप्रियता वाढतच गेली व १८ स्वातंत्र्योत्तर काळात १८५७ साली ही १८ वी आवृत्ती प्रकाशित करण्यात आली.

आजही या पुस्तकाचे मोल तेवढेच आहे जेवढे त्या काळात होते. परंतु आज या पुस्तकाला फारसे वाचक नाहीत खरे पाहिले तर काळाच्या कसोटीला उतरणारे हे काव्य आहे. ज्ञानेश्वरीसारखा महान ग्रंथ लिहिणाऱ्या ज्ञानेश्वरांसारख्या कवींचे अभंग किंवा तुकारामगाथेतील निवडक अभंग आजच्या धकाधकीच्या काळात मनाला दिलासा देतात तर तानाजी मालुसऱ्यांवरचा तुळशीदासांनी लिहिलेला वीररसपूर्ण पोवाडा देशभक्ती व ओजस्वी वाणीचा प्रत्यय देतो. हा पोवाडा तानाजींनी गड घेतल्यावर लगेचच तुळशीदासांनी लिहिला व प्रत्यक्ष शिवरायांनी तो जीजामाता समवेत ऐकला हे पुस्तकातील वर्णन वाचल्यावर मन पोवाडा वाचताना शिवरायांच्या काळात जाते व थरारून उठते.

आजच्या पिढीला उत्तम जर काही द्यावयाचे असेल तर परत या काव्याला उजाळा मिळावा व मुलांना टिव्ही सिनेमापेक्षाही या काव्यांची गोडी लागली तर वेगळ्या संस्कारवर्गांची गरज पालकांना भासणार नाही. या ग्रंथातील अभंगाचा गोडपणा व लावणीतही शृंगाररस असूनही संयम व जीवनाचे तत्त्वज्ञान सांगितलेले आहे. त्यामुळे शृंगाररस हा बीभत्स रूपात आपल्यासमोर येत नाही तर त्यातील सौंदर्य मनाला भावते व लावणीसुद्धा अभंगाच्या तोडीची कशी अध्यात्मिक आहे हे लक्षात येते. ह्या पुस्तकामुळे काव्याचे विविध प्रकार एकत्रितपणे बघायला मिळतात व हे काव्य वृत्त, अलंकारानी सजलेली प्रतिभादेवी भासते. ह्याच पुस्तकात शेवटी कठीण शब्दांचा कोश दिला आहे व ठिकठिकाणी तळटीपा दिल्या आहेत त्यामुळे कविता सजण्यास सुलभ झाली आहे. काही काव्य आख्यानरूपात असल्याने वाचनास रोचक वाटते व या ग्रंथांच्या सुरुवातीलाच संपादक परशुरामतात्या गोडबोले ह्यांनी मोठ्या विनम्रतेने वाचकांस ग्रंथ वाचण्यास सुचविले आहे ते पुढीलप्रमाणे

काव्यामृताचा नवनीत भेला ।
हा गोड लागो तुमच्या जिभेला ।
याची तुम्ही चाखुनि घ्याल गोडी ।
तरी सुखाची मिळवाल जोडी ॥

तर असा हा ग्रंथ त्या काळात प.बा. गोडबोल्यानी किती महत्प्रयासाने महाराष्ट्रभर हिंडून काव्य गोळा केले व रसिकांच्या दरबारात पेश केले.

हे वेचे बहुयत्ने मेळविले परशुरामतात्याने ।
ज्याने (वाचकाने) अवलोकावे पावावी शीघ्र रसिकता त्याने ॥

## टीका आणि टीकाकार

लेखक - वामन भार्गव पाठक

प्रथमावृत्ती - १९४८

प्रकाशक - कुसुम नैय्यर
नॅशनल इन्फर्मेशन ॲण्ड पब्लिकेशन लि.
६, तुलक रोड, अपोलो बंदर, मुंबई.

मुद्रक - प्र. भा. काळे
प्रतिभा मुद्रणालय, ३३५, शनिवार पेठ, पुणे.

पृष्ठे - ४८२

मूल्य - १२ रु.

'टीका आणि टीकाकार' या पुस्तकाचे लेखक वामन भार्गव पाठक यांनी पी.एच.डी. च्या पुस्तकासाठी वरील विषय निवडला होता व ह्या प्रबंधासाठी त्यांना गुरुवर्य साहित्यसम्राट कै. नरसिंह चिंतामण केळकर यांचे अलभ्य मार्गदर्शन लाभले होते. हा प्रबंध १९४४ मध्ये मुंबई विश्वविद्यालयात मान्य केला गेला व नंतर त्यात कमीअधिक भर घालून ग्रंथरूपाने वाचकांसमोर सादर झाला.

प्रस्तुत ग्रंथात टीका व टीकाकार असे दोन भाग केले आहेत. पहिल्या दहा प्रकरणात विषयाच्या मूलभूत तत्वांची संशोधनात्मक शास्त्रीय चर्चा केली असून दुसऱ्या विभागात प्राचीन व आधुनिक मराठी वाङ्मयात रसिकांनी वेळोवेळी जी तांत्रिक पद्धतीवर व ग्रंथावर टीका केली त्या तत्वांचे शास्त्रीय पद्धतीने विवरण करण्याचा प्रयत्न ग्रंथकाराने केला आहे.

रसिक वाचकाच्या अभिरुचीत त्याच्या व्यक्तीमत्वाचा तर आस्वादनात त्याच्या मनोव्यापारांचा समावेश असतो जितकी अभिरुची संपन्न तितकीच ती विकसनशील असते असे लेखकाने मानसिकदृष्ट्या विवरण केले आहे.

पुस्तकाच्या दुसऱ्या विभागात पहिल्या भागात जे टीकाशास्त्रविषयक निकषांवर आधारित प्राचीन व अर्वाचीन वाङ्मयाचे मूल्यमापन करणे हा मुख्य विषय आहे. प्राचीन वाङ्मयात ग्रंथाचा परामर्श घेणाऱ्या स्वतंत्र टीकाकाराचे नाव सांगता येत नसले तरी प्राचीन कवी रसिकांच्या उत्तेजनाची किती उत्कट अपेक्षा करीत असत हे त्यांनीच केलेल्या आत्मनिवेदनातून दिसून येते.

अर्वाचीन वाङ्मयाच्या दृष्टीने टीकात्मक वाङ्मय ह्या नवीनच वाङ्मयप्रकाराची स्वतंत्रपणे मराठी भाषेत निर्मिती होत गेली आहे व बहुतेक नामवंत लेखक हेच उत्तम टीकाकार होते हे लेखकाने नमूद केले आहे.

प्रस्तुत लेखकाचे हे शास्त्रीयदृष्ट्या परिपूर्ण व टीकाशास्त्राचे नियम सिद्ध करणारे असे आहे. आजच्या काळात टीकेला जे ओंगळ स्वरूप व खालच्या पातळीवरील टीका दिसून येते या पार्श्वभूमीवर लेखकाचा हा प्रबंध सर्वच क्षेत्रातील लोकांना मार्गदर्शन वाटेल असा आहे. राजकारण, समाजकारण वा कोणतेही क्षेत्र एकमेकांवर चिखलफेक करण्यात धन्यता मानत आहेत परंतु टीका ही इतकी खालच्या पातळीवर करता येत नाही. दुसऱ्यातील मार्मिक दोष काढून संग्रहणात्मक संतुलितपणे त्यावर भाष्य करणे हे सुसंस्कृतपणाचे लक्षण होय. त्यामुळे हे पुस्तक आजही वाचनीय असेच आहे. ह्या पुस्तकाच्या शेवटी ग्रंथकारनाम सूची दिली असून ग्रंथात वाङ्मयप्रकाराच्या विविध अंगाचा टीकात्मक रीतीने परंतु शास्त्रीय दृष्टीने कसा परामर्श घ्यावा याचे मार्गदर्शन केले आहे.

**सौ. मंजिरी माणिक कुलकर्णी**
डोंबिवली

# स्वातंत्र्यवीर सावरकरांना अभिप्रेत असलेले हिंदुत्व

स्वा. सावरकर म्हटले की हिंदूंचे रक्षण करणारी, हिंदू समाजाची सुधारणा करण्यासाठी मनापासून झटणारी, हिंदूंचे संघटन करण्याचे तळमळीने कार्य करणारी व जाज्वल्य देशभक्तीची अशी करारी मूर्ती डोळ्यांसमोर उभी राहते. स्वा. सावरकरांवर अनेक थोर लेखकांनी पुस्तके लिहिली आहेत तर चित्रकार सोवनी यांनी 'चित्रमय' सावरकर चरित्र प्रसिद्ध केले आहे. श्री. गोविंदस्वामी आफळे, डॉ. भावे इत्यादींनी सावरकर चरित्र काव्यांत गुंफले आहे. या थोर देशभक्त व त्याचप्रमाणे धुरीण समाजसुधारकाविषयी कितीही लिहले तरी ते अपुरेच आहे.

स्वत: स्वा. सावरकरांनी त्यांचे बालपण व त्यांच्या जन्मठेपेचा साधारणपणे १९१० ते १९२४ पर्यंतचा भाग त्यांच्या 'माझी जन्मठेप' या पुस्तकात विस्तृतपणे लिहिला आहे. क्रांतीकाराकांचे स्फूर्तिदाते, गुरु नि मार्गदर्शक म्हणून स्वा. सावरकरांना लंडनमध्ये १३ मार्च १९१० ला अटक करण्यात आली व त्यांना ५० वर्षे सश्रम कारावासाची काळ्या पाण्याची शिक्षा झाली. 'अनादि मी अनंत मी' या विचारांच्या प्रभावाने अंदमानच्या कारागृहातील अनंत यातना सोसूनही स्वा. सावरकर जिवंत राहले. मृत्यूच्या जबड्यांतून सुखरूपपणे बाहेर पडले ही परमेश्वराची कृपाच होय.

काळ्या पाण्याची शिक्षा झालेल्या क्रांतीवीर सावरकरांना ६ जानेवारी १९२४ रोजी येरवडा कारागृहांतून खालील दोन अटींवर सोडण्यात आले. पहिली अट पाच वर्षेपर्यंत प्रकटपणे वा अप्रकटपणे राजकारणात भाग घ्यायचा नाही व दुसरी अट म्हणजे शासनाच्या आज्ञेवाचून रत्नागिरी जिल्ह्याच्या सीमेबाहेर जायचे नाही. अशा परिस्थितीत स्वा. सावकरकर अस्पृश्यता निवारण व शुद्धी यांचा प्रचार करू लागले. १९२५ मध्ये त्यांनी श्री. जाधव या ख्रिश्चन महारास व पंधरा वर्षांपूर्वी ख्रिश्चन झालेल्या धाक्रस कुटुंबास हिंदु करून घेतले. व श्री. धाक्रस यांच्या ज्येष्ठ कन्येचा विवाह आफिक्रेतून परत आलेल्या श्री. पुणतांबेकर यांच्याशी लावून दिला. या विवाहाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे श्री. पुणतांबेकर हे परदेशातून हे सिंधुबंदी मोडलेले व श्री. धाक्रसांची मुलगी शुद्धीकृत केलेली होती. या विवाहाने या दोन्ही बेड्या तोडल्या गेल्या. एवढेच नव्हे तर रत्नागिरीच्या नागरिकांनी उत्साहाने या धर्मातरीत लोकांचे स्वागत करून त्यांना विठ्ठल मंदिराचे दर्शन घेऊ दिले व गावातील अनेक प्रमुख लोकांनी त्यांच्यासमवेत सहभोजन केले. तसेच वाट चुकलेल्या मायबहिणींना सोडवून त्यांना घरात बसविण्यास किंवा कोठे नोकरी लावून देण्याचे कार्यही स्वा. सावरकर व त्यांचे सहकारी कित्येकदा लोकापवाद सहन करूनही करीत असत. वाट चुकलेली मुले जर मुसलमान साधू व ख्रिश्चन मिशनरी यांचे हाती पडली तर ते त्यांना बाटवीत किंवा वाईट मार्गाला लावत याविषयीही ते लोकांत जागृती निर्माण करीत. अशाप्रकारे अनाथांना साह्य करण्याचे कार्य ते करीत.

स्वा. सावरकरांची हिंदुत्वाकडे बघण्याची दृष्टी समाजशास्त्रीय होती पण त्याबरोबरच तिच्यात राजकीय दूरदर्शीपणा पुरेपूर भरला होता. त्यामुळेच त्यांनी आपली हिंदुत्वाच्या व्याख्येची मदार केवळ हिंदुधर्मावर ठेवली नाही तर जे जे समाजसमूह वास्तविकपणे हिंदू गणले जात होते ते ते समाजसमूह आपल्या व्याख्येत हिंदूच ठरतील व जे जे समाजसमूह अहिंदू मानले जात होते ते ते समाजसमूह आपल्या व्याख्येने अहिंदूच ठरतील अशी दक्षता घेतली. सामाजिक वास्तवाची अचूक दाद घेणे हे त्यांच्या हिंदुत्वाच्या व्याख्येचे मोठे यश होते व समाजशास्त्रीय वैशिष्ट्य होते. शिवाय जे लोक हिंदुसमाजापासून किंवा हिंदुत्वातून फुटून निघण्याचा संभव वाटत होता त्यांना स्वा. सावरकरांनी आपल्या हिंदुत्वाच्या व्याख्येने अधिक स्पष्टपणे हिंदू ठरविले. त्याची जाणीव आधीच हिंदु समाजाला मिळाली हे स्वा. सावरकरांच्या राजकीय दूरदृष्टीचे मूर्तिमंत प्रतीक होय. हिंदूंच्या कल्याणासाठी हिंदूसमूह अधिकात अधिक मोठा होईल याची दक्षता घेतली. स्वातंत्र्यवीर

सावरकरांच्या पूर्वी हिंदुत्वाच्या अनेक व्याख्या तयार झाल्या होत्या. परंतु त्यांच्या व्याख्येत समाजशास्त्रीय दृष्टी आणि राजकीय शहाणपणा या दोहोंचा समाजशास्त्रीय समन्वय झालेला होता.

येरवडा तुरुंगातून राजकारणात भाग न घेण्याच्या अटीवर स्वातंत्र्यवीरांची सुटका झाली व रत्नागिरी जिल्ह्याच्या सीमेबाहेर न जाण्याचे बंधनही त्यांच्यावर लादले गेले तेव्हा त्यांनी हिंदूमधील जातीभेदाच्या उच्चाटनाचा कार्यक्रम हाती घेतला. जातिभेदामुळे आपला हिंदू समाजच नव्हे तर आपला देश विभागला जात आहे याची जाणीव त्यांना झाली. जातीभेद म्हणजे चातुर्वण्य नव्हे नि जातीभेद किंवा चातुर्वण्य म्हणजे हिंदुत्व नव्हे याची खूणगाठ त्यांनी मनाशी बांधली व चातुर्वण्य व जातिभेद यांची गल्लत हिंदुत्वाशी न करता जातिभेद निर्मूलनाचे कार्य त्यांनी हाती घेतले या कार्यामुळे त्यांचे राष्ट्रप्रेम व हिंदुत्वाभिमानही प्रकर्षाने दिसून येतो. हिंदू समाज सुसंघटित आणि बलशाली करण्यासाठी जातिभेद नष्ट करणे आवश्यक आहे हे त्यांच्यासारख्या डोळस समाजसुधारकाने बरोबर हेरले होते व त्यांच्यासारख्या प्रज्ञावान माणसाने जातिभेदातील उच्चनीचता व जन्मजात विशिष्ट अधिकार या मुख्य दोषांवरच आपले लक्ष केंद्रित केले. स्वा. सावरकर बाहेरच्या हिंदूंना जो उपदेश करीत त्याप्रमाणेच ते स्वत: रत्नागिरीत वागत. ते स्वत: रत्नागिरीतल्या वेगवेगळ्या हिंदु समाजातील गटांना भेटत. त्यांना त्यांचे अधिकार सागत त्यासाठी संघटित होण्याचे आवाहन करीत. रत्नागिरीच्या विविध जातीतली आपसांतील वैमनस्य दूर करून सलोख्याने वागण्यास सांगत. तेथील राधाकृष्ण मंदिर व विठ्ठल मंदिर या दोन गटांत वैश्य हिंदू विभागले गेले होते त्यांना एकत्रित करून गोकुळ अष्टमीचे दिवशी दोन्ही पालख्या एकत्रितपणे काढल्या व त्यांची मिरवणूक गावातून वाजतगाजत मिरवून आणली. स्वा. सावरकरांनी रत्नागिरीच्या गणेशोत्सवासाठी पुणे हिंदूसभेचे अध्यक्ष श्री. सिद्धेश्वर शास्त्री चित्राव यांना आमंत्रित केले होते व या उत्सवात सर्व जातीचे हिंदू एकत्रितपणे आले तसेच महार, चांभार भगिनी हळदीकुंकवासाठी आल्या हे पाहून श्री. चित्रावशास्त्र्यांना खूप आश्चर्य वाटले. या सर्व गोष्टींवरूनच स्वा. सावरकरांना अभिप्रेत असलेल्या हिंदुत्वाची प्रखर प्रचिती येते.

येरवडा तुरुंगातून रत्नागिरीत आल्यापासून त्यांना राजकारणात भाग घेण्याची व जिल्ह्याबाहेर जाण्याची बंदी होती त्यामुळे त्यांनी हिंदुसमाजाने स्वत:च्या पायात अडकवून घेतलेल्या स्पर्शबंदी, शुद्धीबंदी, व्यवसायबंदी, मंदिरप्रवेशबंदी, रोटीबंदी आणि शेवटी वेदोक्तबंदीही अशा स्वदेशी शृंखला एकापाठोपाठ तोडण्यासाठी अविरत कार्य केले. 'जो हिंदु त्याला वेदोक्ताचा अधिकार असलाच पाहिजे मग तो महार असो वा महाराज' असे त्यांचे स्पष्ट मत होते. जन्मजात जातिभेद न मानता सर्व हिंदूंना केवळ मंदिरप्रवेशाचाच नव्हे तर पूजेचाही समान अधिकार असलेले 'पतितपावन मंदिर' १९३१ साली बांधून पूर्ण केले. श्री. भागोजी शेट कीर यांनी या मंदिराला अर्थसाहाय्य केले. परंतु श्री. भागोजी शेट हे भंडारी जातीचे म्हणून त्यांना पूर्वपरंपरेने वेदोक्त पूजेचा अधिकार नव्हता. तरीसुद्धा त्यांच्याहस्ते धार्मिक विधी केले. या समारंभास शंकराचार्य कुर्तकोटी, मसूरकर महाराज, पांचलेगावकर महाराज यांच्यासारखे संतमहंत, गोव्यातील शुद्धीकृत हिंदूसह श्री. लवंदे, महार व चांभार पुढारी आले होते व सर्वजण एकत्र बसून जन्मजात जातिभेद न मानता त्यात सहभागी झाले होत. या श्रीविष्णूलक्ष्मीची -पतितपावन मूर्तीची प्राणप्रतिष्ठा झाल्यावर सर्व हिंदूसमाजाने 'हिंदूधर्म की जय' या निनादाने आसमंत भरून गेला. या मंदिराच्या कळसावर फडकणाऱ्या कुण्डलिनी कृपाणांकित हिंदुध्वजाने सांगितले की आता हिंदूहिंदूत जन्मजात जातिभेद, अस्पृश्यता वेगळेपण मानणारी जुनी रुढी पूर्णपणे मोडली. मानवतेवर आधारलेला हिंदुसमाज, समर्थ संपन्न व संघटित होण्याची प्रक्रिया चालू झाली. अशाप्रकारे पतितपावन मंदिराच्या मूर्तिस्थापनेचा क्रांतीकारक व हिंदुसमाजसुधारक कार्यक्रम स्वा. सावरकरांनी अत्यंत निर्धाराने व यशस्वीपणे साजरा केला. यातच त्यांना अभिप्रेत असलेल्या हिंदुत्वाची

वेळोवेळी प्रचिती येते. वेदप्रामाण्य आणि उपासनेच्या बाबतीत कोणताही विषय ही हिंदूधर्माची लक्षणे आहेत जो हिंदुधर्मीय आहे तो हिंदू होय ही व्याख्या धर्मसंस्कृती प्रधान आहे. स्वा. सावरकरांच्या मते ही व्याख्या बरोबर नाही कारण त्यामुळे हिंदुसमाजाची व्याप्ती संकुचित होते व त्यामुळे बौद्ध, शीख, जैन इ. अनेक लोक हिंदूधर्माच्या कक्षेबाहेर जातात. म्हणून त्यांनी हिंदूंची व्याख्या 'आसिंधुसिंधुपर्यन्ता यस्य भारतभूमिका । पितृभूपुण्यभूश्चैव सेवे हिंदुरितिस्मृता ॥' अशी केली आहे. सिंधू नदीपासून महासागरापर्यंत पसरलेली भूमी ही ज्याची पितृभूमी आणि पुण्यभूमी आहे तो हिंदू होय. या पवित्र भूमीत ज्यांचे पूर्वज जन्मले असले पाहिजेत व त्याच्या धर्माचे विकसन करणारी संस्कृती उदयास आली पाहिजे या दोन अटींची पूर्तता हिंदू ठरण्यासाठी झाली पाहिजे. या स्वा. सावरकरांच्या हिंदुत्वाविषयीच्या व्याख्येमुळे हिंदुत्वाची व्याप्ती वाढली आहे व हिंदु हा धर्म नसून तो एक सर्व समावेशक सनातन समाज आहे असे त्यांनी आग्रहपूर्ण प्रतिपादन केले. एकूण या सर्व गोष्टींवरून स्वा. सावरकरांना अभिप्रेत असलेल्या हिंदुत्वाची परिपूर्ण कल्पना आपल्याला येते.

स्वा. सावरकर हे महान देशभक्त व महान स्वातंत्र्ययोद्धे होते. भारताच्या स्वातंत्र्यासाठी त्यांनी केलेला महान त्याग, भोगलेला सश्रम कारावास आणि भोगलेल्या अनंत यातना या त्यांच्या पिढीतीलच नव्हे तर त्यानंतरही क्वचितच कोणी सहन केल्या असतील. त्यांच्या प्रेरणेने स्वातंत्र्यसैनिकांना मिळालेली स्फूर्ती, अमोघ वक्तृत्त्वाची देणगी, उत्तम साहित्यिक, महाकवि, हिंदुत्वाच्या राजकारणाचे नेतृत्व व त्यांचे समाजचिंतन अशा अनेकविध पैलूंमुळे त्यांचे अतुलनीय व्यक्तिमत्व सिद्ध होते. अशा या थोर क्रांतिकारकाला, थोर देशभक्ताला व हिंदू समाजाचे आजन्म हित साधण्याची कळकळ असणाऱ्या नेतृत्वाला माझे कोटीकोटी प्रणाम.

दिव्यत्वाची जेथ प्रचिती । तेथे कर माझे जुळती ॥

**सौ. मालती देवधर**
दूरध्वनी : २५४० ३४६०




- भारत स्वतंत्र होऊन ५७ वर्षे संपून ५८ वे वर्ष सुरू होत आहे. आणखी दोन वर्षांनी भारतीय स्वातंत्र्याचा हीरक महोत्सव साजरा होईल.
- योगी अरविंद घोष यांचा जन्मदिन (१८७२)
- ठाण्यातील योगशास्त्रातले हटयोगी निकम गुरुजी यांचा हा जन्मदिन (१९१७)
- मराठी रंगभूमीवरील असामान्य नट गणपतराव जोशी यांचा जन्मदिन (१८६०)
- मराठीतील प्रख्यात सात्पाहिक 'साधना' या दिवशी सुरू झाले. (१९४८)
- भारतात पोस्टल इंडेक्स नंबर (PIN) ची पद्धत सुरू झाली. (१९७२)
- फ्रान्सचा सम्राट नेपोलिअन बोनापार्ट याचा जन्मदिन (१७६९)

**संकलित**

# परिसर वार्ता

हार्दिक अभिनंदन !

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या उन्हाळी २००४ च्या परीक्षेचा निकाल दि. ६ जुलै २००४ रोजी जाहीर झाला.

महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाच्या, पदविका अभ्यासक्रमाच्या परीक्षेत विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनातील गुणवंत विद्यार्थ्यांनी विशेष यश संपादन केले आहे.

| वर्ष | शाखा | नाव | गुण |
|---|---|---|---|
| तृतीय वर्ष | केमिकल इंजिनियरींग | पांडे सरोजकुमार फुलचंन्द्र | ७०.४८% |
| तृतीय वर्ष | इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टिम | झिंगरे श्रेयस रामकृष्ण | ८३.३१% |
| तृतीय वर्ष | इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स | भोसले मयुरेश दिलीप | ८२.६९% |
| तृतीय वर्ष | इन्स्ट्रूमेंटेशन | गुप्ते मोहन सुभाष | ८०.९२% |
| तृतीय वर्ष | इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी | देशपांडे स्वप्नील मोहन | ७३.१२% |
| तृतीय वर्ष | ॲडव्हान्स डिप्लोमा इन इंडस्ट्रियल सेफ्टी | डांगी बलवंत धनसींग | ८०.९१% |

या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष, डॉ. विजय बेडेकर यांच्या हस्ते झाला. यावेळी विद्या प्रसारक मंडळाचे माननीय सभासद श्री. दिलीप जोशी, प्रा. मोहन पाठक - बी.एन्. बांदोडकर सायन्स महाविद्यालयाचे ग्रंथपाल, विद्यार्थ्यांत प्रिय असलेले नुकतेच निवृत्त झालेले संस्थेचे माजी प्राचार्य



विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनातील कु. श्रेयस क्षिंगरे (तृतीयवर्ष इ.पी.एस्.) सत्कार करताना विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर डावीकडे वि. प्र. मंडळाच्या तंत्रनिकेतनाचे प्राचार्य श्री. नायक

श्री. सी.श्री. मुजुमदार तसेच प्राचार्य डी. के. नायक, इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टिम विभागाच्या प्रमुख प्रा. सौ. वडेर आणि तंत्रनिकेतनातील विभाग प्रमुख, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. विशेष म्हणजे महाराष्ट्र विभागातून विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनातील इलेक्ट्रिकल पॉवर सिस्टिम या विभागाचा विद्यार्थी कु. श्रेयस झिंगरे याने ८३.३१% टक्के गुण मिळवून पहिला येण्याचा मान मिळवला आहे. कु. श्रेयस झिंगरे याने महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या, पदविका अभ्यासक्रमाच्या परीक्षेत उज्ज्वल यश संपादन करून विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाची यशाची परंपरा कायम ठेवली आहे

कौतुकाच्या वर्षावात न्हाऊन निघताना आपल्या यशात मोठा वाटा असलेल्यांबद्दल कृतज्ञता व्यक्त करायला श्रेयस झिंगरे विसरला नाही.


कु. श्रेयस झिंगरे याने प्रथम वर्षापासून उत्तम गुण मिळवून तंत्रनिकेतनातील सर्व विभागात प्रथम येण्याचे

सातत्य ठेवले होते. 'टेक्नो-सेम २००३' हा सेमिनार लक्ष्मीनारायण अग्रवाल मेमोरियल, धामणगांव यांनी आयोजित केला होता. त्या सेमिनारमध्ये कु. श्रेयस झिंगरे याने 'स्टॅटिक्स स्टार्टिंग डिव्हाइस फॉर गॅस टर्बाइन प्लांटस्' हा पेपर सादर केला होता. तसेच राज्यस्तरीय स्पर्धा ज्या गव्हर्नमेंट पॉलिटेक्निक, पुणे विभागातून आयोजित केल्या होत्या, त्यात ही त्याचा सहभाग होता.

अशा या विद्यार्थ्यांचा विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाला अभिमान आहे. उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री श्री. अनिस अहमद यांच्या हस्ते कु. श्रेयस झिंगरे याचा यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान सभागृहात ६ जुलै २००४ रोजी गुणवत्ता यादीत आल्याबद्दल सुवर्णपदक देऊन सत्कार करण्यात आला. या समारंभास डायरेक्टर ऑफ डायरेक्टरेट टेक्निकल एज्युकेशन श्री. पासलकर, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे डायरेक्टर श्री. टाले, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे सेक्रेटरी श्री. धनोकर, रिलायन्स इंडस्ट्रीचे चीफ फायनान्स प्रेसिडेंट श्री. चैनी, मलकापूर आमदार श्री. संचेती उपस्थित होते. याशिवाय विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाचे प्राचार्य श्री. नायक, विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनाचे माजी प्राचार्य श्री. मुजुमदार, विद्या प्रसारक मंडळाचे माननीय सभासद श्री. दिलीप जोशी, इ.पी.एस्. विभाग प्रमुख सौ. वडेर आणि इतर तंत्रनिकेतनाचेही मान्यवर प्राचार्य आणि शिक्षक उपस्थित होते.

## करिअर सांभाळून विधायक काम करता येतं

अमेरिकेतील विद्यापीठातून उच्च शिक्षण घेतलेल्या डॉ. पांडे यांनी आपलं जीवन शिक्षण व समाजकार्य यासाठी वाहिलं आहे. त्यांच्या उत्तरप्रदेशातील लालपूर व बालिया इथल्या कामाची जागतिक पातळीवर दखल घेतली गेली आहे. त्यांना २००२ चा मॅगसेसे पुरस्कार मिळाला आहे.



डॉ.पांडे

२००४ हे वर्ष जगभर विज्ञान जागृती वर्ष म्हणून साजरे होत आहे. ठाण्यातील शाळा व कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी भरीव कार्य करणाऱ्या 'जिज्ञासा' या एनजीओला महाराष्ट्र राज्य विज्ञान व तंत्रज्ञान संचालनालयाकडून विज्ञानविषयक उपक्रम करण्याचे प्रतिनिधित्व मिळालं आहे. 'जिज्ञासा'ने कॉलेज विद्यार्थ्यांसाठी 'युथ ग्रुप'ची स्थापना केली आहे. त्या माध्यमातून समाजासाठी विज्ञान हा प्रकल्प उभा केला आहे. ठाणा कॉलेजच्या युथ ग्रुपने नालासाफाईच्या प्रकल्पावर तर ज्ञानसाधना कॉलेजच्या विद्यार्थी ग्रुपने हवेच्या प्रदूषणामुळे येणाऱ्या समस्या यावर यशस्वीरीत्या काम केलं. विद्यार्थ्यांच्या या यशाचं निरीक्षण व कौतुक करायला डॉ. पांडे मुद्दाम आले होते.

डॉ. पांडे यांनी विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबन व सामाजिकता याची जाणीव असणं आवश्यक आहे, असं सांगितलं. समाजात बदल घडवून आणायचा असेल तर रचना व संघर्ष यांचा संयोग करून युवकांनी काम केलं पाहिजे. युवापिढीला समाजाबद्दल ममत्व वाटेल, असं उपक्रम हाती घेतले तर ते उत्साहाने त्यात सहभागी होतील व यातूनच त्यांचं नेतृत्व बहरेल. भारतातील शिक्षणपद्धती भक्कम मूलभूत पायावर उभी असून ती अमेरिकेपेक्षा सरस

आहे. मात्र अमेरिकेतील शिक्षणपद्धती जास्त लवचिक आहे, तिथले विद्यार्थी शिक्षणात एक-दोन वर्षांची विश्रांती घेऊन त्या काळात आपल्या आवडीचं काम करतात. नंतर अभ्यास पूर्ण करतात. 'आशा आश्रमा'तून ही संकल्पना आणली असून तिला चांगला प्रतिसाद मिळाला आहे.

'केवळ अणुबॉम्ब असणं हे कोणत्याही देशाचं सामर्थ्य ठरू शकत नाही. कालची महासत्ता असलेल्या देशांना आज अणुबॉम्ब रक्षणाचा खर्च परवडत नाही हे सत्य आहे. त्याऐवजी तो खर्च देशातील शिक्षणावर खर्च केला पाहिजे,' असं सांगून डॉ. पांडे यांनी कोका कोला व पेप्सी अशा परदेशी कंपन्यांच्या कारभाराबद्दल युवकांनी आवाज उठवला पाहिजे, असं मत व्यक्त केलं. आपली नैसर्गिक साधनं वापरून या कंपन्या लाखो डॉलर्सची कमाई करतात व त्यांच्या जाहिरातीसाठी सिनेकलाकार व क्रिकेटर्स काम करतात हे लाजिरवाणं आहे. आज या कंपन्या आपल्या भूमीतलं पाणी वापरून बिसलेरी वॉटर विकतात. त्यामुळे जमिनीची पाण्याची पातळी २५ फूट खोलीगेली आहे. युवकांनी नेतृत्व करून आंदोलन केलं पाहिजे. शेवटी डॉ. पांडे यांनी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांना उत्तर दिली.

'जिज्ञासा'चे संस्थापक सुरेंद्र दिघे यांनी जिज्ञासा युथ ग्रुप याबाबत माहिती दिली. 'उत्साही व कल्पक विद्यार्थ्यांना आम्ही नवा मंच उपलब्ध करून दिला आहे. त्यामुळे मुलांचं व्यक्तिमत्व संपन्न होतं. आत्मविश्वास वाढतो. तसंच अलीकडे कार्पोरेट कंपन्यांमध्ये मुलाखत घेताना सामाजिक जाणीव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य दिलं जातं त्याचा फायदाही युथ ग्रुपच्या मुलांना मिळतो.'

## गीतेश शिंदे यांचे यश

आचार्य अत्रे कट्टा, चेंबूर आयोजित राज्यस्तरीय काव्यलेखन स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ नुकताच मोठ्या उत्साहात पार पडला. या स्पर्धेत बा.ना. बांदोडकर



**गीतेश शिंदे**

विज्ञान महाविद्यालयात शेवटच्या वर्षाला शिकणाऱ्या गीतेश गजानन शिंदे यास प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. यावेळी कविवर्य नारायण सुर्वे यांच्या हस्ते प्रमाणपत्र, पुस्तके आणि पुष्पगुच्छ देऊन गीतेशचा सत्कार करण्यात आला.

सदर स्पर्धेत राज्यभरातून सुमारे ६०० कविता आल्या होत्या. या स्पर्धेचे आयोजन आचार्य अत्रे कट्ट्याचे प्रमुख एकनाथ आव्हाड आणि स्पर्धाप्रमुख कवी दत्तात्रय सैतवडेकर यांनी केले. या समारंभास पोलिस अधिकारी कवी धनराज वंजारी आणि कवी अजित राऊळ हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

याप्रसंगी कविवर्य नारायण सुर्वेनी अध्यक्षीय भाषण करताना, कविता टिकवायची असेल तर माणसं वाचता आली पाहिजेत, असे प्रतिपादन करून उपस्थितांना मार्गदर्शन केले. यापूर्वीही गीतेशला विविध स्पर्धांतून अनेक पारितोषिके मिळाली असून या यशाबद्दल ठाण्यातील या नवोदित कवीचे कौतुक होत आहे.

**संकलित**

# विद्या प्रसारक मंडळाचे बाळकृष्ण नाईक बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

## यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ ग्रंथालय आणि माहितीशास्त्र निष्णात पदवी अभ्यास केंद्र

## विद्यार्थ्यांची प्रकल्प यादी (२००३ – २००४)

| क्र. | अभ्यासक | मार्गदर्शक | विषयाचे (प्रकल्प) नाव |
|---|---|---|---|
| १ | एकबोटे, वैशाली | डॉ. द. ना. फडके | महाविद्यालयीन ग्रंथालयाचे संगणकीकरण एक सर्वेक्षण |
| २ | कदम, रूपाली | प्रा. मोहन पाठक | कीर्ती एम्. डुंगरसी, डी. जी. रूपारेल आणि रामनारायण रूईया महाविद्यालयातील पदवी स्तरावर (तृतीय वर्ष) संपूर्ण मराठी विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांचे अवांतर वाचन एक शोध. |
| ३ | गायकवाड, संगीता | श्री. डोंगरे सतीश | मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाचा सूची कार्यातील सहभाग. |
| ४ | गुणे, उदय | श्री. नारायण बारसे | ''सार्वजनिक वाचनालय कल्याण'' एक अभ्यास |
| ५ | गोष्टे, मनिषा | डॉ. प्रकाश करमरकर | शहापूर तालुक्यातील निवडक माध्यमिक ग्रंथालये : एक अभ्यास |
| ६ | जाधव, चंद्रकांत | सौ. चित्रलेखा चितळे | नवी मुंबई परिसरातील अभियांत्रिकी महाविद्यालयामधून दिल्या जाणाऱ्या ग्रंथालय सेवांचा अभ्यास. |
| ७ | डोंगरे, शैला | सौ. चित्रलेखा चितळे | श्री. ह. श्री. परांजपे यांच्या ग्रंथपालन कारकीर्दीचा अभ्यास. |
| ८ | देशपांडे, मिनाक्षी | प्रा. महेश दळवी | ठाणे जिल्ह्यातील सार्वजनिक ग्रंथालयांचे उपक्रम : एक अभ्यास |
| ९ | परेश, सिबल | डॉ. हिंदूराव वायदंडे | अली यावर जंग राष्ट्रीय श्रवण विकलांग संस्थेमार्फत मूक व कर्णबधीर मुलांना / व्यक्तींना दिल्या जाणाऱ्या ग्रंथालय सेवा : एक अभ्यास |
| १० | पाटील, विलास | डॉ. प्रकाश करमरकर | भाईंदर ते बोरिवली परिसरातील सार्वजनिक ग्रंथालयाचा अभ्यास |
| ११ | बनसोडे, अनिल | प्रा. नारायण बारसे | मनोरुग्णांच्या सेवेच्या कार्यात येरवडा, पुणे येथील प्रादेशिक मनोरुग्णांच्या ग्रंथालयाचे योगदान : एक चिकित्सक अभ्यास |
| १२ | बुधावले, हेमंत | श्री. महेश दळवी | कै. श्री. वासुदेव विष्णु भट यांचे ग्रंथालय क्षेत्रातील योगदान |
| १३ | रूळे, संजय | डॉ. दत्तात्रय फडके | नवी मुंबई परिसरातील वैद्यकीय महाविद्यालयातील ग्रंथालये : एक अभ्यास |
| १४ | वझवेकर, मंगेश | प्रा. मोहन पाठक | लक्ष्मीकांत सार्वजनिक वाचनालय कर्जत येथील नियतकालिकांचा होणारा उपयोग. |
| १५ | सूर्यवंशी, शरद | प्रा. एन्.एस्. बारसे | नवी मुंबई शहरातील व्यवस्थापन महाविद्यालयीन ग्रंथालयाचा अभ्यास. |
| १६ | नगराळे, अर्चना | प्रा. एन्. एस्. बारसे | नवी मुंबई ऐरोली विभागातील विद्यार्थ्यांची वाचन अभिरूची : एक अभ्यास. |

संकलन : **श्री. सुनील केदारे**

Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006


**विद्या प्रसारक मंडळ, ठाणे**

# थोरले बाजीराव पेशवे सभागृह

३०० आसने, आधुनिक दृकश्राव्य यंत्रणा उपलब्ध,
प्रसन्न वातावरण, उपाहाराची व्यवस्था,
वहाने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा.

संपर्क

कार्यवाह,

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

**दूरध्वनी : २५४२ ६२७०**


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिंटर्स, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.